दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –३८६ शनिवार दि.०३ ऑक्टोबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-386 Saturday, Dt.03 October 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# मराठवाड्यात भीषण पाणीटंचाई! पिके करपली, बीडमधील वाण नदी कोरडीठाक

## अनेक धरणे शून्यावर; जायकवाडीत किती पाणीसाठा?



राज्यात पावसाळ्याची सुरुवात दमदार झाली असली तरी ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे राज्यभरातील धरणांमधील पाणीसाठा कमी होत आहे. मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा आता तीव्र होताना दिसत आहेत. पाऊस नसल्याने पिके तर हातातून गेली आहेतच. दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष ही जाणवू लागले आहे. बीड धाराशिव परभणीसह अनेक जिल्ह्यातील गावांमध्ये नद्या, तलाव कोरडेठाक पडू लागले आहेत. पुन्हा एकदा मराठवाड्यात सर्वात कमी पाणीसाठा शिल्लक राहिला असून भीषण पाणीटंचाईकडे हा विभाग वाटचाल करत आहे. कुठला धरणात किती पाणीसाठा शिल्लक राहिलाय? ॅक्टोबरच्या सुरुवातीला ८५.६२% पाणीसाठा शिल्लक होता. यावर्षी हा पाणीसाठा राज्यातील सर्वात कमी ४३.६६% नोंदवण्यात आला आहे. ही आकडेवारी दोन ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील सर्वात मोठे धरण अशी ओळख असणाऱ्या जायकवाडी धरणात सध्या ७७.०८% पाणीसाठा शिल्लक आहे. मागच्या वर्षी याच सुमारास धरण ९७.७५ टक्के भरले होते. धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून सोडले जाणारे पाणी हे प्रामुख्याने शेतीसाठी वापरले जाते. छत्रपती संभाजीनगर व जालना शहर आणि परिसरातील शेकडो गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा जायकवाडी धरणातून होतो. तसेच विविध एमआयडीसी वसाहतींना यातून पाणी पुरवले जाते. दुष्काळाची दाहकता वाढत असून येत्या काही दिवसात हा पाणीसाठा वर्षभर कसा पुरेल? अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

बीडमध्ये भीषण परिस्थिती, वाण नदीचं पात्र कोरडंठाक

गेल्या चार महिन्यात बीडमध्ये एक ते दोन वेळा पाऊस पडला. त्यानंतर पावसाने उघडीप दिली. परिणामी आता नद्या कोरड्या पडू लागल्या आहेत.पावसाअभावी बीडच्या वाण नदीचे पात्र अक्षरशः कोरडेठाक पडले आहे. वाण प्रकल्पाला पाणी आल्यानंतर वर्षातून किमान दोन वेळा ही नदी प्रवाहित होते. मात्र यंदा पाऊस नसल्याने वाणधरणातच अत्यल्प पाणीसाठा आहे. ही नदी यंदा एकदाही प्रवाहित झालेली नाही. दुसरीकडे माजलगाव धरणातला पाणीसाठा २७.९८ टक्क्यांवर आला आहे. गेल्यावर्षी याच सुमारास धरण्यात ९८% पाणीसाठा होता. मांजरा धरण गेल्या वर्षी १००% भरलं होतं सध्या ते दहा टक्क्यांवर आलं आहे.

# सणासुदित दुष्काळासह महागाईचे सावट..?

## रेपो रेट वाढला की देशातील सामान्य व्यक्तींच्या ईएमआयवर थेट परिणाम..!

मुंबई /प्रतिनिधी

देशात सणासुदीचा हंगाम सुरू झाला आहे. या हंगामात किरकोळ बाजारात खरेदी मोठ्या प्रमाणात होते. परंतु किरकोळ बाजारातील वाढत्या महागाईमुळे सामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री बसत आहे. तर उत्पादक मंडळी आणि विविध कंपन्याही घाऊक बाजारातील महागाईमुळे त्रासले आहेत. सणासुदीच्या दिवसात जिथे बाजारात मागणी वाढते आणि खरेदी करणे सामान्यांसाठी गरज बनून जाते अशावेळी वाढत्या महागाईमुळे सामान्यांच्या खिशाला गळती बसत आहे.

जुलै महिन्यात किरकोळ महागाईचा दर ४.४५ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात या दराने ४.८२ टक्क्यांचा आकडा गाठला तर सप्टेंबर मध्ये एसबीआयने ५.६५ अंदाज वर्तविल्यानंतर सप्टेंबरची नोंद ४.८२ इतकी नोंदविण्यात आली आहे. एकंदरीत देशात किरकोळ महागाई वाढली आहे त्यामुळे सामान्य नागरिकांना यंदाचे सण खर्चिक जाणार असल्याचे दिसून येत आहे.घाऊक महागाईत खाद्य वस्तूंची महागाई ७.०५% नोंदवण्यात आली आहे. उत्पादित वस्तूंची महागाई ८.३७% नोंदवण्यात आली आहे. तर इंधन आणि वीज महागाईचा आकडा २२.९३% वर पोहोचला आहे. देशात

पान २ वर....



### अन्न महागाईच्या दरात झाली वाढ..

जुलै महिन्यात किरकोळ अन्न महागाईचा दर ५.५२ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात आकडा ५.९५ टक्के इतका झाला. तर घाऊक बाजारातील महागाईचा दर जुलै महिन्यात ६.६५ टक्के होता. ऑगस्ट महिन्यात यात वाढ होऊन आकडा ७.०५ टक्क्यांवर पोहोचला. एकंदरीत गेल्या महिन्यात अन्न महागाईच्या किरकोळ दरात तसेच घाऊक दरातही वाढ नोंदवण्यात आली. अन्न महागाईच्या दरात वाढ म्हणजे सामान्यांसाठी आवश्यक असणारे भाजीपाला, धान्य, डाळी, दूध, फळे तसेच मसाल्यांसारख्या खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ.

### उत्पादक मंडळी महागाईने त्रस्त

फक्त किरकोळ बाजारात नव्हे तर घाऊक बाजारातही मोठी वाढ दिसून आली आहे. जुलै महिन्यात घाऊक बाजारातील महागाईचा दर ९.७८ टक्के नोंदवण्यात आला होता. ऑगस्ट महिन्यात त्यात वाढ होऊन आकडा ९.९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. एकंदरीत एकीकडे देशातील उत्पादक मंडळी तसेच कंपन्या घाऊक बाजारात वाढत्या महागाईचा सामना करत आहेत. तर दुसरीकडे सामान्य नागरिक किरकोळ बाजारात वाढत्या महागाईने त्रस्त आहेत.



बीड – राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पार्टीच्या माजी आमदार ज्येष्ठ विधीज्ञ अँड. उषाताई दराडे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि लोकजगतच्या संपादक शेख आयेशा यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ अँड मोतीराम बापू दराडे उपस्थित होते.

# रेल्वे स्थानकासमोरील गर्दी हटवली
## वाहतूक शाखेच्या नियोजनामुळे प्रवाशांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

बीड रेल्वे स्थानकासमोर नागरिकांची वाढती गर्दी होत असल्याने रेल्वे प्रवाशांना ये–जा करताना अडथळ्यांचा सामना करावा लागत होता. त्यातच पैलवान चौक ते रेल्वे स्थानक या मार्गावर रस्ते दुरुस्तीचे काम सुरू असल्याने या मार्गावर सध्या एकेरी वाहतूक सुरू आहे. त्यामुळे रात्री साडेनऊच्या सुमारास रेल्वेने प्रवास करण्यासाठी स्थानकाकडे येणार्या नागरिकांची मोठी गैरसोय होत होती.

या पार्श्वभूमीवर हिंद मैत्री ग्रुपचे अध्यक्ष आबा चौरे व सेवानिवृत्त फौजदार अशोक ठोकळ यांनी जिल्हा वाहतूक शाखेकडे वाहतूक सुरळीत करण्याबाबत मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधिक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि

पान २ वर....



### नागरिकांनी सहकार्य करावे– पोलीस निरीक्षक वैभव पाटील

अनेक वर्षाच्या कालावधीनंतर बीडकरांचे स्वप्नपूर्ती साध्य झाली असून आता बीडकरांसाठी रेल्वेप्रवासाची सुविधा झाली आहे. हा प्रवास आणखीन सुखाचा व्हावा यासाठी या परिसरात रस्ताकाम चालू असून काही दिवस एकेरी वाहतूकीचा प्रश्न आहे त्यामुळे नागरिकांनी संयम राखून पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी केले आहे.

## अखिल भारतीय तैलिक साहू महासभेची राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक बीडमध्ये

### छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री अरुण साव मुख्य अतिथी, जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी

बीड /प्रतिनिधी

अखिल भारतीय तैलिक साहू महासभा, नवी दिल्ली यांच्या वतीने राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक तसेच सामान्य सभा शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी देशभरातून महासभेचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाला छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री ना. अरुण साव हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, अखिल भारतीय तैलिक साहू महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

सकाळी १०.३० वाजता मुख्य द्वारावर मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी १०.३५ वाजता मान्यवरांचे आगमन व स्थानापन्न होईल. या वेळी डॉ.

पान २ वर....

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये ‘मराठी संस्कृतीचे वेशभूषा रचनेतील महत्त्व’ यावर एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



बीड (प्रतिनिधी)

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी ‘मराठी संस्कृतीचे वेशभूषा रचनेतील महत्त्व’ या विषयावर एकदिवसीय विशेष कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी मराठी संस्कृती, पारंपरिक पोषाख आणि आधुनिक फॅशन यांचा समन्वय कसा साधावा, याचे प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन घेतले.

कार्यशाळेसाठी मुख्य मार्गदर्शक म्हणून एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई येथील मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. राजश्री पाटील उपस्थित होत्या. त्यांनी ‘मराठी संस्कृती, पारंपरिक वेशभूषा आणि आधुनिक फॅशन डिझाईनमधील तिचे महत्त्व’ या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मराठी संस्कृतीतील पारंपरिक वेशभूषा, तिची वैशिष्ट्ये, विविध प्रादेशिक पोषाख, रंगसंगती, कापड, अलंकार आणि नक्षीकाम यांचा आधुनिक फॅशन डिझाईनमध्ये नाविन्यपूर्ण वापर कसा करता येईल, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्य

पान २ वर....









बीड ऑक्टोबर

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून ’स्वच्छता हीच सेवा’ या संकल्पनेतून स्वच्छता, स्वच्छ परिसर व निरोगी जीवनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी, बीड यांनी स्वतः स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला.

जिल्हाधिकारी यांनी आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात झाडू हाती घेत स्वच्छता करत अभियानाची सुरुवात केली. त्यांच्या या कृतीने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या स्वच्छता मोहिमेत जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत कार्यालय परिसर स्वच्छ केला. तसेच जिल्हा रुग्णालय, बीड येथेही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली असून, रुग्णालय परिसरातील कचरा काढून स्वच्छता करण्यात आली.

स्वच्छतेमुळे आरोग्य सुरक्षित राहते, त्यामुळे प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

संपादकीय

शनिवार दि.०३ ऑक्टोबर २०२६
SATURDAY, DT.03 OCTOBER 2026



## संपादकीय....

# एका व्यक्तीसाठी कायदा बदलणार की सहकाराची प्रतिष्ठा जपणार ?

बीड – महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात जिल्हा बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिसऱ्या अपत्याच्या पात्रतेचा मुद्दा चर्चेत आला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७३–उ– मध्ये समिती सदस्यांच्या अपात्रतेच्या तरतुदी आहेत आणि अधिकृत कायद्यात त्यासंबंधी स्पष्ट निकष नमूद आहेत.

या पार्श्वभूमीवर एखाद्या विशिष्ट उमेदवारासाठी नियम शिथिल करण्याची चर्चा होत असेल, तर ती केवळ एका व्यक्तीची उमेदवारी किंवा एका जिल्हा बँकेची निवडणूक एवढ्यापुरती मर्यादित राहत नाही. कायदा सर्वांसाठी समान असतो; त्यामुळे बदल करायचा असेल तर तो व्यक्तिनिष्ठ नव्हे, तर व्यापक धोरणाच्या भूमिकेतून आणि पारदर्शक प्रक्रियेतून झाला पाहिजे.

दुसरीकडे नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमोरील आर्थिक आव्हानेही दुर्लक्षित करता येणार नाहीत. कारखान्यांची कथित मोठी थकबाकी, बँकेच्या वसुलीचा प्रश्न आणि त्याचा शेतकरी, ठेवीदार व स्थानिक अर्थकारणावर होणारा संभाव्य परिणाम यावर सार्वजनिक चर्चेपेक्षा ठोस कारवाई आणि अधिकृत आकडेवारी आवश्यक आहे.

दुष्काळ, कर्जबाजारी शेतकरी, पाणी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था हे प्रश्न गंभीर असताना राजकीय सोयीसाठी कायद्यात बदल करण्याची वेळ येऊ नये, एवढीच अपेक्षा. शासनाने कोणताही निर्णय घेताना त्या निर्णयाचा फायदा कोणाला होईल यापेक्षा तो नियम भविष्यात सर्व नागरिकांना समानपणे कसा लागू होईल, याचा विचार करणे आवश्यक आहे.

सहकार हा महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत कोण जिंकतो किंवा कोण पराभूत होतो, यापेक्षा कायद्याची विश्वासार्हता, बँकेची आर्थिक शिस्त आणि ठेवीदार– शेतकऱ्यांचा विश्वास अबाधित राहतो का, हा खरा प्रश्न आहे.एका व्यक्तीसाठी नियम बदलल्याची भावना निर्माण झाली, तर प्रश्न केवळ एका निवडणुकीचा राहणार नाही. तो शासनाच्या निर्णयप्रक्रियेवरील जनविश्वासाचा बनेल. म्हणून सरकारसमोर खरी कसोटी हीच कायदा व्यक्तीनुसार बदलणार की व्यक्ती कायद्यानुसार पात्र ठरणार ?



## महात्मा गांधी, लालबहादुर शास्त्री जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजीनगर (जिमाका)

राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त २ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले. अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, तहसिलदार, नायब तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

पान १ वरून..

**सणासुदित दुष्काळासह.....**

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूच्या किमतीने आभाळ गाठले आहे याचा मोठा परिणाम उत्पादन क्षेत्रावर होत आहे. त्यामुळे कंपन्यांचे वाहतूक खर्च पूर्णपणे दबावाखाली गेले आहेत. किरकोळ महागाईचा दर ४ टक्क्यांच्या आत ठेवण्याचा भारतीय रिझर्व बँकेचा निर्धार आहे. परंतु गेल्या तीन महिन्यांपासून हा दर ४ टक्क्यांच्या वर राहिला आहे.

रेपो रेट वाढणार..?

जर महागाई नियंत्रणात आली नाही तर पुढच्या बैठकीत भारतीय रिझर्व्ह बँक महागाईच्या दबावामुळे रेपो रेट वाढवू शकते. रेपो रेट वाढला की देशातील सामान्य व्यक्तींच्या ईएमआयवर परिणाम होण्याची शक्यता आहे. परिणामी ईएमआय वाढू शकतो. सध्या रेपो रेट ५.२५ टक्के आहे

**तुलसी कॉलेज ऑफ ...**

डॉ. अश्विनी बेद्रे, उपप्राचार्य सैय्यद शहाना, धाराशिवच्या प्राचार्य वृषाली भोसले व छत्रपती संभाजीनगरच्या प्राचार्य स्वप्नाली सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शनादरम्यान बोलताना डॉ. पाटील म्हणाल्या, आत्मभान असणे हेच खऱ्या कलेचे सर्वात मोठे लक्षण आहे. फॅशन डिझायनिंग क्षेत्रात काम करताना विद्यार्थ्यांनी स्वतःचे सांस्कृतिक मूळ नेहमी जपले पाहिजे. कामात सचोटी आणि कौशल्य असेल, तर आंतरराष्ट्रीय ख्यातीचा फॅशन डिझायनर म्हणून ओळख मिळणे नक्कीच शक्य आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले.

प्रा.प्रदीप रोडे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात, विद्यार्थिनींनी पारंपरिक कलेला आधुनिकतेची जोड देऊन फॅशन डिझायनिंगच्या क्षेत्रात आपल्या महाविद्यालयाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. अश्विनी बेद्रे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळेची पार्श्वभूमी व भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या अवघडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार वृषाली लोखंडे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, फॅशन डिझाईन विभागातील सर्व विद्यार्थिनी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अखिल भारतीय तैलिक....**

अरुण भस्मे यांच्यासह महासभेचे राष्ट्रीय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माँ कर्मा माता, संत संताजी जगनाडे महाराज आणि स्वर्गीय केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात होईल.

या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीमध्ये महासभेच्या विविध संघटनात्मक आणि सामाजिक विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. देशातील तैलिक साहू समाजाच्या विविध प्रश्नांबाबत तसेच समाजाच्या संघटनात्मक बळकटीकरणासाठी पुढील दिशा निश्चित करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

दरम्यान, याच दिवशी दुपारी ३ वाजता माँ वैष्णो पॅलेस, एम.आय.डी.सी., बीड येथे अखिल भारतीय तैलिक साहू महासभेची सामान्य सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेलाही छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री अरुण साव मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून, राष्ट्रीय अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर अध्यक्षस्थानी राहतील.

पान १ वरून..

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय महासचिव श्री. रामलाल गुप्ता, राष्ट्रीय कोषाध्यक्ष श्री. अमरेंद्रकुमार तसेच अतिरिक्त महासचिव डॉ. अरुण भस्मे यांच्यासह महासभेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय पातळीवरील या बैठकीच्या निमित्ताने बीडमध्ये तैलिक साहू समाजातील विविध पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती राहणार असून, समाजाच्या आगामी वाटचालीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहे.

**रेल्वे स्थानकासमोरील.....**

पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी रेल्वे स्थानक परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली.रस्ते दुरुस्तीमुळे एकेरी वाहतूक सुरू असताना रेल्वेची वेळ गाठण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक स्थानकाकडे येत असल्याने वाहतुकीवर ताण निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी वाहतूक पोलिसांनी सहकार्याची भूमिका घेत वाहतुकीचे योग्य नियोजन केले यावेळी महिला पोलीस अंमलदार रुक्मीण तिडके, अनिता पवार, पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळे , चालक हवालदार संतोष हारके यांनी वाहतुक सुरळीत करण्यासाठी सहकार्य केले. तसेच रेल्वे स्थानकासमोरील मार्गावर अनावश्यक गर्दी होऊ नये आणि प्रवाशांना ये–जा करण्यासाठी मार्ग मोकळा राहावा, यासाठी संबंधितांना आवश्यक सूचना करण्यात आल्या.वाहतूक शाखेच्या पोलिसांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन केलेल्या तात्काळ नियोजनामुळे रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली. त्यामुळे रात्रीच्या वेळी रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पालवन चौक ते रेल्वे स्थानक या मार्गावरील रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन कायम ठेवावे, तसेच रेल्वे प्रवाशांची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता घ्यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.



**बीड (जिमाका)**

**परडी माटेगाव (ता. वडवणी, जि. बीड) – ग्रामपंचायत परडी माटेगाव येथे सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला.या अभियानांतर्गत गावात आणि सार्वजनिक स्मशानभूमी परिसरात लोकसहभागातून भव्य ग्रामस्वच्छता अभियान राबवण्यात आले. सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत परिसराची स्वच्छता केली.गाव स्वच्छ तर आरोग्य सुरक्षित या संकल्पनेतून हे अभियान राबवण्यात येत असून, यापुढेही गावात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.स्मशानभूमी परिसरातील वाढलेले गवत, कचरा काढून संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे.**


**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–१२२३ दि.३१.०८.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जाबीर युनूससेठ तांबोळी रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कुर्रत उल ऐन जाबीर तांबोळी | मुलगी | २५.०२.२०२५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ३१/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**मा. के. सी. माने ३रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात,**
**बीड, ता.जि. बीड**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक १३३९/२०२६**
**सीएनआर क्रमांक एमएचबीआय ०२०००२३५८२०२६**
**रेणुबाई विठ्ठल खांडे व ईतर वि. निरंक**
**(मार्फत ॲड. वाय. एस. टेकाडे)**

अर्जदार :–
१. रेणुबाई भ्र. विठ्ठल खांडे, वय–७२ वर्षे, धंदा–घरकाम, रा. म्हाळस जवळा ता. जि. बीड
२. लहु पि. विठ्ठल खांडे, वय–२६ वर्षे, धंदा–शेती, रा. म्हाळस जवळा ता. जि. बीड
४. उर्मिला भ्र. बाळू बोरवडे, वय–३६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. भाटसांगवी ता. जि. बीड
५. संजीवनी भ्र. भाउसाहेब खाकरे, वय–५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. ववाकनाथपुर ता. जि. बीड
६. अयोध्या भ्र. दत्तात्रय मीठे, वय ३६ वर्षे, धंदा–घरकाम, रा. आमला वाहेगांव ता. गेवराई जि. बीड
७. सुशिलाबाई पि. दादासाहेब वाघ, वय–४८ वर्षे, धंदा–घरकाम, रा. येळंब घाट ता. जि. बीड

**विरुध्द**
**निरंक**

**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत विठ्ठल रंगानाथ खांडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत विठ्ठल रंगानाथ खांडे यांचा मृत्यु दिनांक १६/०६/२०२६ रोजी झालेला आहे. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले व अर्जदार क. ४ ते ७ या मयताची विवाहित मुली आहेत. मयत विठठल रंगनाथ खाडे यांना दोन पत्नी होत्या पहिली पत्नी रुक्मीण मयत असून अर्जदार क. ५ ते ७ या पहिली पत्नी मयत रूक्मीण हिच्या विवाहित मुली आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत विठ्ठल रंगानाथ खांडे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वानी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख २२/०९/२०२६

आज दिनांक १९ माहे ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

शिक्का

आदेशावरून
**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
सह.दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७६४/२०२६**
आप्पासाहेब पि.रंगनाथ कानगुडे वि.निरंक
**(मार्फत–ॲड.एल.जी.कुलकर्णी, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **रंगनाथ पि.राघुजी कानगुडे रा.गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे दि.१६.०५.२०२१ रोजी मौजे ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/ झाल्या आहेत.सदरहु मयताच्या नावे खालीलप्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव/कंपनीचे नाव/ पतसंस्थेचे नाव | बचत खाते क्रमांक | रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा गेवराई ता.गेवराई जि.बीड | ५२१७०२३४०१५ | ६२४१०.९५/– |

अर्जदार **आप्पासाहेब पि.रंगनाथ कानगुडे वय–५५ वर्षे, धंदा–शेती, रा.कानगुडे गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड** यांना वरील रक्कम मिळणेकामी अर्जदार यांना कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **रंगनाथ पि.राघुजी कानगुडे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.२३/०९/२०२६** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –०५/११/२०२६**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क. ७५५/२०२६**
**शमिम व इतर वि. निरंक**
**मार्फत –ॲड. एम. वाय. इनामदार**

अर्जदार :–
१.शमीम कासम कुरेशी, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा.धोंडराई, ता. गेवराई जि.बीड
१. सलिम कासम कुरेशी, वय ३६ वर्षे, धंदा–मजुरी, रा. धोंडराई, ता. गेवराई जि.बीड
१. हाजराबी मुश्ताक कुरेशी, वय – ४१ वर्षे, धंदा–घरकाम, रा.तांडा बाजार, जामा मशिदीजवळ, ता. सिल्लोड जी.औरंगाबाद
१. नुरजहा इब्राहिमभाई घावडा, वय – ३८ वर्षे, व्यवसाय–घरगुती काम, रा. भगवतीपारा, राजकोट, ता.जि.जिल्हा राजकोट, गुजरात.

**विरूध्द**
**निरंक**

**मागणी :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार हे मयताचे पती आहेत. मयत नामे कासम अमिशाह कुरेशी यांचा मृत्यु दिनांक २४–०९–२०२० रोजी रा.धोंडराई, ता. गेवराई जि.बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे कासम अमिशाह कुरेशी या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे कासम अमिशाह कुरेशी यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख ०३/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड याचे न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क. ७५३/२०२६**
**गगुबाई व इतर वि. निरंक**
**अॅड.एच.एस.पाटील**

अर्जदार :–
१.गंगुबाई भ्र शेषराव शिंदे, वय ८० वर्षे, धंदा घरकाम, रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड २.मालनबाई भ्र जगन्नाथ शिंदेवय–५६ वर्षे, धंदा–शेती रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि.बीड ३.प्रकाश पि जगन्नाथ शिंदे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड ४.रमेश पि जगन्नाथ शिंदे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड ५.समाधान पि जगन्नाथ शिंदे, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड
६.कांताबाई भ्र दिलीप कु–हाडे, वय – ३६ वर्षे, धंदा शेती, रा. टाकळी अंबड, ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर ७.अनिता भ्र तुकाराम धोत्रे, वय – ३१ वर्षे, धंदा शेती, रा. भोगलगांव, ता. गेवराई जि. बीड

**विरूध्द**
**निरंक**

**मागणी :–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील प्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क ०१ ही मयताची आई असुन अर्जदार क ०२ ही मयताची पत्नी आहे तसेच अर्जदार क ०३ ते ०७ हे मयताचे अपत्य आहेत. मयत नामे जगन्नाथ शेषेराव शिंदे यांचा मृत्यु दिनांक ३०–०१–२०२६ रोजी रा. तळणेवाडी, ता. गेवराई जि. बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे जगन्नाथ शेषेराव शिंदे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे जगन्नाथ शेषेराव शिंदे याचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख ०३/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**जाहिर प्रगटन**
**बीड येथील श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दि. अर्ज क. ७७५/२०२६**
**कुशिवर्ता व इतर वि. निरंक**
**ॲड.पी.एम. वाघमारे**

**अर्जदार**
**१.कुशिवर्ता भ्र मनोहर मोरे वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. जळगाव मजरा, ता. गेवराई जि.बीड**
**२. विश्वनाथ पि मनोहर मोरे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. जळगाव मजरा, ता. गेवराई जि. बीड**
**३. रमेश पि मनोहर मोरे वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. जळगाव मजरा, ता. गेवराई जि. बीड**

**विरूध्द**
**निरंक**

**मागणी :–बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क ०१ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क ०२ व ०३ हे मयताचे मुले आहेत. मयत नामे मनोहर पि आश्रुबा मोरे यांचा मृत्यु दिनांक २५–१२–२०२४ रोजी रा.धानोरा, ता. गेवराई जि. बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे मनोहर पि आश्रुबा मोरे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, नामे मनोहर पि आश्रुबा मोरे यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख ०६/११/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि–११७९ दि.–.–.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विशाल बाबुराव पाचफुले, रा.दुधपुरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विशाल बाबुराव पाचफुले | स्वतः | ११.०५.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– –/–/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



**जाहीर प्रगटन**
**ॲड. वाय. एस. टेकाडे**
**मा. श्री. एम. एस. जेलर ५वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज १६४८/२०२६**
**केसरबाई व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :–
१. केसरबाई भ्र. भिमराव चव्हाण, वय–७५ वर्षे, धंदा–घरकाम
रा. पेंडगाव ता. जि. बीड
२. राजेंद्र पि. भिमराव चव्हाण, वय–४४ वर्षे, धंदा–शेती,
रा. पेंडगाव ता. जि. बीड
३. परमेश्वर पि. भिमराव चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा–शेती,
रा. पेंडगाव ता. जि. बीड
गैरअर्जदार :– निरंक
(अर्जदार हे भारतीय आहेत)

**मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भिमराव काशिनाथ चव्हाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत भिमराव काशिनाथ चव्हाण यांचा मृत्यु दिनांक २९.०५.२०१६ रोजी पेंडगाव ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क.१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क.२ व ३ ही मयताची मुले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरह मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत भिमराव काशिनाथ चव्हाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१ ऑक्टोंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८ नोव्हेंबर २०२६

स्वाक्षरित
**क. लिपीक**

शिक्का

आदेशावरून
**स्वाक्षरित**
**अधीक्षक**
सह.दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६७१/२०२६**
**रंगुबाई भ्र. रामभाऊ वाघ व इतर वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. एम. वाय. इनामदार)**

ज्याअर्थी मयत नामे रामभाऊ पि. गेणुजी वाघ, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड हे/हया दिनांक ०४/०२/२००६ रोजी धोंडराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. १ रंगुबाई भ्र. रामभाऊ वाघ, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ भगवान पि. रामभाऊ वाघ, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ भागवत पि. रामभाऊ वाघ, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ४ जालिंदर पि. रामभाऊ वाघ, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. धोंडराई ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत रामभाऊ पि. गेणुजी वाघ यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २८/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख – २१/१०/२०२६

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# स्व.केशरबाई क्षीरसागर यांच्या विसाव्या पुण्यस्मरणानिमित्त लेख...

## अहमदनगर बीड परळी या रेल्वे प्रकल्पासाठी धडपडणाऱ्या स्व. केशरबाई (काकू) सोनाजीराव क्षीरसागर

बीड -

एका सर्वसामान्य घरात जन्मलेल्या स्त्रीने समाजकारणाचा वसा हाती घेऊन आयुष्यभर जनतेच्या हिताची कामे केली. ज्याकाळी स्त्रीयांना समाजात अनेक बंधने होती त्याकाळात प्रस्थापित राजकारण्यांविरोधात संघर्ष करून जनसामान्यांचे प्रश्न त्यांनी हिरीरीने मांडले. देशातील सहकार क्षेत्रात साखर कारखान्याच्या पहिल्या महिला चेअरमन होण्याचा मान केशरकाकुंनी आपल्या कर्तृत्वाने मिळवला असं म्हटलं जातं की प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो अगदी त्याचप्रमाणे प्रत्येक यशस्वी महिलेच्या यशामध्ये तिच्या पतीने दिलेलं स्वातंत्र्य आणि साथ महत्वाची असते. त्यामुळेच तर म्हणावे वाटते काकू मनामनात काकू जना जनात..!

मागील काळात मराठवाड्यातील मागास आणी ऊसतोड कामगारांचा जिल्हा समजल्या जाणार्या बीड जिल्हयामध्ये स्व.केशरकाकूंनी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, अध्यात्मिक, शेती आणी शेतकरी, रोजगार व राजकिय क्षेत्रात बहुमोल विधायक कार्य केले. एक स्त्री असताना सुध्दा मागासलेल्या भागाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य, तळमळ, दूरदृष्टी, धडपड , कामाचे योग्य नियोजन महाराष्ट्र कधीच विसरू शकरणार नाही. बीड जिल्ह्याने देशाला आणि राज्याला अनेक कर्तृत्ववान माणसं दिली. आपल्या नेतृत्वाने ज्यांनी जिल्ह्याचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचवले यांपैकी सर्वप्रथम ज्यांचा उल्लेख करावा वाटतो त्या म्हणजे बीड जिल्ह्याच्या एका अर्थाने शिल्पकार स्व. केशरकाकू सोनाजीराव क्षीरसागर होय.

स्व. काकुंच्या संघर्षामध्ये स्व. नाना हे खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे होते काकूंनी नवगण राजूरी येथून आपल्या राजकीय जीवनाला सुरुवात केली सरपंच, पंचायत समिती सभापती अशी विविध पदे भूषवत जिल्ह्याच्या राजकीय पटलावर




स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. स्वर्गीय काकूंनी वंचित, पिडित आणि गरीब कुटुंबातील मुला-मुलींना शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या. सैनिकी शाळा, होमिओपॅथिक, मेडिकल कॉलेज, फार्मसी, कृषी, साखर कारखाना , सुत गिरणी, बँक उभारणीसह, विविध शाळा, महाविद्यालयाची दर्जेदार उभारणी करून मुंबई-पुण्यासारख्या ठिकाणी उपलब्ध असणा-या सर्व शैक्षणिक, सहकारी सुविधा आपल्या बीड जिल्ह्यात त्यांनी उपलब्ध करून दिल्या तसेच ग्रामीण भागात शाळा आणि महाविद्यालयांची उभारणी करुन दीन-दलित, उपेक्षित सामान्य घटकाच्या अंधकाररुपी आयुष्यात ज्ञानरुपी ज्योत पेटवण्याचं काम आदरणीय काकुंनी केलं.

सामाजिक जीवनात वावरत असताना कोणतीही जात-पात, धर्म-पंथ असा भेदभाव न करून सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेऊन स्व. काकुंनी आयुष्यभर विकासाचं राजकारण केलं.अल्पसंख्यांक समाजातील दोन व्यक्तींना आमदार करण्यांचं श्रेय बीड जिल्ह्यात फक्त आणि फक्त स्व. काकुंनाच जातं. बीड-नगर-परळी रेल्वे मार्गाची सर्वप्रथम मागणी स्व. केशरकाकू यांनीच संसदेत केली. नगर- बीड- परळी या रेल्वे प्रकल्पाला आवश्यक असणारी मंजुरीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केले त्यामुळेच उशिरा का होईना बीडला रेल्वे धावत आहे.

राजकीय जीवनात वावरत असून देखील कला, क्रीडा, साहित्य या क्षेत्रांकडे त्यांचं विशेषकरून लक्ष असायचं. अनेक उद्योन्मुख कलावंतांना प्रोत्साहन देण्याचं काम त्या सदैव करत असत.शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे मार्गक्रमण करणार्या आणि नवगण राजूरीच्या सरपंच पदापासून देशाच्या संसदेपर्यंत आपल्या कार्याचा ठसा उमटवला अशा कार्यसम्राट स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या कार्याचा आदर्श घेऊन माजी मंत्री लोकनेते श्री. जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श शिक्षण संस्थेची यशस्वीपणे वाटचाल चालू असून आदर्श शिक्षण संस्थेसह विविध संस्थाचे कार्य चालू आहे. लोकनेते जयदत्त आण्णा क्षीरसागर साहेबांच्या प्रयत्नशील नेत्रत्वास आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा.राजुजी मचाले, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी प्रा. योगेश पवार सर, एम.ए.राऊत, क्षीरसागर सर यांचे योगदान लाभले असून रविवार दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी स्व.लोकनेत्या केशरबाई (काकू) सोनाजीराव क्षीरसागर यांच्या विसाव्या पुण्यस्मरणानिमित्त काकूंच्या चरणी शतशः नमन..!

लेखक

प्रा. धनवंत नानासाहेब मस्के, बीड



बीड - पवित्र पोर्टलद्वारे बीड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून निवड झाल्याबद्दल मोहिबा खानाम मोहब्बत खान यांचा बीडच्या उपशिक्षणाधिकारी श्रीमती अंजुम शेख मॅडम यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोहिबा खान यांचे पती मोहम्मद अजीम (सोलापूर पोलीस) तसेच पुतणी शेख आयेशा यांची प्रमुख उपस्थिती होती.

## अपघातात शिरूरच्या मामा सह बीडच्या दोन भाच्याचा दुर्दैवी मृत्यू !

### त्या आईला दोन मुलाचा आणि भावाचा दु:खाचा डोंगर कसा पेलवणार ?

शिरूर कासार/प्रशांत बाफना : येथील रहिवाशी असलेल्या मामाला व त्याचेकडे असलेल्या आपल्या भावाला घेऊन जाण्यासाठी आलेल्या दुस-या भावासह तिघावर काळाने अपघातात झडप घातली मामासह दोन्ही भाच्याचा दुर्देवी मृत्यू झाल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना मंगळवारी उशिरा रात्री हिवरसिंग्याजवळ घडली .भरधाव येणाऱ्या टेम्पोने मोटार सायकलवर असलेल्या तीघांना धडकले त्यात तीघांचा मृत्यू झाला .

येथील रहिवासी बाजीराव शेळके यांचा मुलगा राम शेळके (३३) वर्ष आपल्या बिड येथील मंगेश रोहिदास बजगुडे (१९) व गणेश बजगुडे (२१) या दोन भाच्यासह शिरूरवरून मंगळवारी रात्रीच्या वेळी जात मोटारसायकलवरून जात असतांना बीड कडून येणाऱ्या टेम्पोने भरधाव वेगात धडकले त्यात जागीच तीघाचाही मृत्यू झाला .

तिघाचे शवविच्छेदन बीड येथे झाल्यानंतर राम शेळके यांचेवर अमरधाम स्मशान भुमित अंत्यसंस्कार करण्यात आले . थकलेल्या बापावर मुलाच्या प्रेतयात्रेत हाती शिकाळी घेण्याची वेळ आल्याने हृदय पिळवटून जात होते .



आईचा हंबरडा आणि आक्रोश !

आपल्या तरूण मुलाचा असा दुर्दैवी मृत्यू सहन न झाल्याने शांताबाई शेळके यांनी आक्रोश करत हंबरडा फोडला .

भावाच्या अंत्यविधीला बहीण पारखी झाली !

आपल्या सख्या भावाचा आणि दोन मुलाचा अपघातात एकाच वेळी एकाच जागी मृत्यू झाला मुलाचा अंत्यविधी बीडला केला गेला मात्र दुर्दैवाने भावाच्या अंत्यविधीला बहीण मंदा रोहीदास बजगुडे ही पारखी झाली होती . त्यांचे दोन्ही मुले आणि एक भाऊ यांच्या मृत्युच्या

दु: खाचा डोंगर कोसळला आहे .अपघातस्थळ पाटोदा पो स्टे हद्दीत ! अपघात स्थळ हे पाटोदा पो स्टे हद्दीत असल्याने पोलीस कारवाई पाटोदा पोलीस करत आहेत



## समृद्धी महामार्गावर काळाचा घाला

### पिकअप-ट्रकच्या धडकेत ७ ठार, १८ जखमी

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे जवळ समृद्धी महामार्गावर एक अत्यंत भीषण अपघात घडला आहे. शेगावहून वर्धाकडे दुर्गा देवीची मूर्ती घेऊन जाणारी बोलेरो पिकअप आणि मागून येणाऱ्या ट्रक यांच्यात झालेल्या जोरदार धडकेत ७ जणांचा मृत्यू झाला असून, १८ जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, एका पिकअप गाडीमधून काही भाविक शेगावहून वर्ध्याकडे दुर्गा देवीची मूर्ती घेऊन जात होते. समृद्धी महामार्गावरील चॅनल ९७ जवळ आले असता, मागून भरधाव वेगाने येणाऱ्या एका ट्रकने या पिकअपला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की पिकअपच्या मागे लावलेल्या ट्रालीचा अक्षरशः चुराडा झाला.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पिकअप गाडीचा वेग अत्यंत कमी होता आणि गाडीला मागे ट्रॉली जोडलेली होती, ज्यामुळे मागून येणाऱ्या ट्रकचालकाचा अंदाज चुकला आणि हा अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. तसेच, पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेतले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या भीषण अपघातातील सर्व जखमींना उपचारासाठी तातडीने वर्धा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# बीड येथे राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचा श्री. मा. जयसिंह पंडित यांच्या हस्ते शुभारंभ!

### बीडच्या मैदानावर रंगणार फुटबॉलचा महासंग्राम; राज्यभरातील संघांचा सहभाग





बीड प्रतिनिधी : बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलावर गुरुवारपासून फुटबॉलचा थरार रंगला आहे. 'आमदार विजयसिंह पंडित चषक' राज्यस्तरीय ११-साईड फुटबॉल स्पर्धेचे श्री. मा. जयसिंह पंडित यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन करण्यात आले. दि. १ ते ५ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या स्पर्धेमुळे बीडच्या क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.ग्रीन स्टार आणि मिलन बॉईज स्पोर्टिंग क्लब यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील विविध भागांतील बलाढ्य संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला असून कोल्हापूर, मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, पुसद, भुसावळ आणि अमरावती येथील संघ मैदानात उतरले आहेत. त्यामुळे स्पर्धेतील सामने चुरशीचे होण्याची शक्यता आहे.बीड जिल्ह्यात फुटबॉल खेळाला व्यापक व्यासपीठ मिळावे, स्थानिक खेळाडूंना राज्यस्तरीय संघांविरुद्ध खेळण्याचा अनुभव मिळावा आणि नवोदित खेळाडूंना आपल्या गुणवत्तेची संधी मिळावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटनप्रसंगी श्री. मा. जयसिंह पंडित यांनी सहभागी संघ व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. क्रीडा क्षेत्रातील अशा स्पर्धांमुळे स्थानिक खेळाडूंना प्रोत्साहन मिळून बीडमधील फुटबॉलला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसेच बीडकर क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा, असे आवाहन करण्यात आले.यावेळी संपादक श्री. मुजीबभाई शेख, नगरसेवक श्री. अश्फाक इनामदार, नगरसेवक श्री. जयतुल्ला खान, श्री. अब्दुल वकील सर, नगरसेवक श्री. जकी सौदागर, नगरसेवक श्री. महेश धांडे, नगरसेवक श्री. बिलाल शेख, श्री. अखिल सर, श्री. अरुणभाऊ चौरे, मुगीसोद्दीन खलीलोद्दीन यांच्यासह आयोजक, विविध संघांचे खेळाडू व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एसआयआरविरोधातील आंदोलनाला घटनात्मक आधार नाही - मंत्री आशिष शेलार



**मुंबई : मतदार यादीच्या विशेष सखोल पडताळणीची (एसआयआर) प्रक्रिया निवडणूक आयोगाने निश्चित कार्यपद्धतीनुसार जाहीर केली असून, राजकीय पक्ष तसेच नागरिकांना त्याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे एसआयआरच्या नावाखाली आंदोलन करण्याला कोणतेही घटनात्मक अधिष्ठान नसल्याची टीका राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी शुक्रवारी केली. 'आंदोलनजीवी सीजेपीचे आंदोलन म्हणजे अराजकतेचे व्याकरण आहे', असे शेलार म्हणाले.**

भाजपा प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे आणि सहमाध्यमप्रमुख ओमप्रकाश चौहान उपस्थित होते. शेलार म्हणाले, निवडणूक आयोगाने एसआयआरचा संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला असून त्याची कार्यपद्धतीही स्पष्ट केली आहे. सर्व राजकीय पक्षांना या प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. अर्ज, दावे-हरकती, सुनावणी तसेच आवश्यक कागदपत्रांबाबतची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांनाही त्याची माहिती देण्यात आली आहे. असे असताना काही राजकीय पक्ष आणि संघटना आंदोलनाची भूमिका का घेत आहेत, असा सवाल शेलार यांनी उपस्थित केला.

एखाद्या प्रक्रियेबाबत आक्षेप असल्यास तो घटनात्मक आणि कायदेशीर मार्गाने मांडता येतो. निवडणूक आयोगासमोर आपली बाजू मांडण्याची संधी असून न्यायालयीन मार्गही उपलब्ध आहे. या संस्थात्मक प्रक्रिया उपलब्ध असताना आंदोलनाच्या माध्यमातून वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा प्रश्न शेलार यांनी उपस्थित केला. एसआयआरच्या माध्यमातून कोणत्याही पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ नये, यासाठी आवश्यक प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. एखाद्या मतदाराच्या नावाबाबत आक्षेप असल्यास संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. त्यामुळे लाखो प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांनी करू नये, असे आवाहनही शेलार यांनी केले.

काँग्रेससह काही राजकीय पक्षांकडून एसआयआरच्या मुद्द्यावर भाजपा आणि सरकारवर सातत्याने आरोप केले जात आहेत. मात्र, निवडणूक आयोग ही स्वतंत्र घटनात्मक संस्था असून तिच्या प्रक्रियेबाबत आक्षेप असल्यास उपलब्ध संस्थात्मक मार्गांचा वापर करणे अपेक्षित आहे, असे शेलार यांनी सांगितले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील भाषणात घटनात्मक मार्गांचे महत्त्व अधोरेखित केले होते. घटनात्मक मार्ग उपलब्ध असताना असंवैधानिक मार्गांचा अवलंब करणे म्हणजे अराजकतेचे व्याकरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते, असा दाखला शेलार यांनी दिला. सध्याच्या परिस्थितीत बाबासाहेबांच्या या विचारांची आठवण होते, असेही ते म्हणाले. लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे; मात्र आंदोलनाच्या माध्यमातून घटनात्मक संस्थांबद्दल अविश्वास निर्माण करणे योग्य नाही. एसआयआर प्रक्रियेबाबत आक्षेप असल्यास ते मांडावेत; मात्र त्यासाठी उपलब्ध घटनात्मक प्रक्रियेचा अवलंब करावा, असे आवाहन शेलार यांनी केले.

## विरोधकांकडून देशाची बदनामी

भारताच्या निवडणूक प्रक्रियेचे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी कौतुक केले असून, २२ देशांच्या प्रतिनिधींनीही भारताच्या निवडणूक प्रक्रियेचे कौतुक केल्याचा दावा शेलार यांनी केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताच्या निवडणूक पद्धतीचे आणि सरकारचे कौतुक झाले की विरोधक त्याविरोधात आंदोलन करून देशाची बदनामी करतात, असा आरोप त्यांनी केला. 'जिथे विरोधक जिंकतात तिथे निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात नाही. भाजपा जिंकली की मात्र यांचा पोटशूळ उठतो,' अशी टीका शेलार यांनी केली. स्वतःचा अजेंडा राबविण्यासाठी राजकीय हेतूने उभे करण्यात आलेले आंदोलन शिवाजी पार्कवर करण्याचा प्रयत्न हा असंविधानिक असल्याचे ते म्हणाले. 'आंदोलनजीवी सीजेपीच्या माध्यमातून जनतेला कदापि न्याय मिळणार नाही,' असेही शेलार यांनी सुनावले.

# राजाराम तलावाजवळ तरुणाला मारहाण करून सोन्याची चेन लुटली

## चार जणांनी घेरले दोघे ताब्यात, सोन्याचा तुकडा जप्त

कोल्हापूर । प्रतिनिधी

राजाराम तलावासमोरील रस्त्यावर २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ६.३० वाजण्याच्या सुमारास श्रेयदा सुनिल कोरे (वय २४, रा. माळगाव, ता. मिरज, जि. सांगली) यांना चार जणांनी घेरून मारहाण व शिवीगाळ केली. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून आरोपी पसार झाले.

याप्रकरणी राजारामपुरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६१६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१०(२), ३०९(४), ११५(२), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार शाहु तळेकर व विशाल शिरगावकर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी रोहित रघुनाथ जाधव (वय २४, रा. विठ्ठलाई कॉलनी, उदगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) आणि सुनिल वसंत वाळकुंजे (रा. धनगर गल्ली, उदगाव, ता. करवीर) यांना ताब्यात घेतले.

रोहित जाधव याच्याकडून चोरीच्या सोन्याच्या चेनचा १ ग्रॅम २१० मिली वजनाचा व सुमारे १० हजार रुपये किमतीचा तुकडा जप्त करण्यात आला. तपासात एकूण पाच आरोपींचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक



आप्पासाहेब जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व राजारामपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विकास जाधव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस उपनिरीक्षक रुपेश इंगळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अमोल पाटील, कृष्णात पाटील, तसेच पोलीस अंमलदार शाहु तळेकर, विशाल शिरगावकर, गजानन हराळे, सचिन पाटील, अमोल पाटील, दिंगबर कुंभार, राहुल कदम, सचिन वायदडे व सुरज भोपळे सहभागी झाले. पुढील तपास रुपेश इंगळे करीत आहेत.



# महात्मा गांधी यांना जयंती निमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अभिवादन

बीड प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक बीड मंडळ संचलित, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्य, अहिंसा आणि सत्याग्रहाचे उपासक राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांना जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम मुख्याध्यापक एस.बी.मेश्राम यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या प्रसंगी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेचे शिक्षक आर.बी.घुले, एन.जी.मुंडे, यु.बी.पवळ हे शिक्षक व आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही.खरसाडे, शिक्षकेत्तर कर्मचारी एल.बी.हजारे, एस.एस. गायकवाड, भारत कोळेकर, एन.पी. गायकवाड व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



# वीरांना मरणाची नाही भीती देश रक्षणासाठी आहे सतत पुढे छाती

## महार रेजिमेंटच्या वर्धापनदिनी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे शूर वीरांना विनम्र अभिवादन

बीड /प्रतिनिधी

१ ऑक्टोबर १९४१ रोजी महार रेजिमेंटची स्थापना भारतीय सैन्य दलात आली. याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जाते त्या महार रेजिमेंट मधील शूरवीरांनी देश रक्षणासाठी आपल्या छातीचा कोट करून अनेकांनी प्राणाचे बलिदान दिले.

महामानव अभिवादन ग्रुप बीड वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय व धम्मदीप बुद्ध विहार यांच्या संयुक्त १ ऑक्टोबर महार रेजिमेंटच्या स्थापनेचे औचित्य साधून आजी-माजी सैनिकांचा सत्कार केला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी सैनिक पंडित चक्रे लाभले होते. तर कॅप्टन राजाभाऊ आठवले, माजी सैनिक कदम प्रकाश चक्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर विचार मचावर सेवानिवृत्त सीईओ पी. व्ही.बनसोडे महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी जी वानखेडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड.तेजस वडमारे यांनी तर प्रास्ताविक प्रा. अशोक गायकवाड यांनी करून देशाच्या सीमेचे संरक्षण करणाऱ्या शहिदांना व कर्तव्यावर असलेल्या वीर सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे कसे गरजेचे आहे हे स्पष्ट केले. महार रेजिमेंटच्या वर्धापनदिनी सर्वप्रथम उपस्थित असलेल्या माजी सैनिकांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रशांत वासनिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले.महामानव अभिवादन ग्रुपचे तरुण सभासद प्रशांत वासनिक याचा वाढदिवस असल्यामुळे त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. सैनिकांच्या सत्काराला उत्तर देताना उपस्थित असलेल्या माजी सैनिकांनी आपल्या सैनिकी सेवेतील चित्त थरारक, कसोटीच्या घटना व जीव घेण्या प्रसंगाचे माहिती देऊन सैनिकांचा जीवनकाळ किती कठीण असतो व त्यांना प्राणाचा त्याग करण्याची भीती नसते, आपले आयुष्य तळहातावर घेऊन देशाच्या सीमेचे रक्षण करीत आसताना चे प्रसंग ऐकून उपस्थिताच्या अंगावर शाहारे उभे राहिले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी. जी.वानखेडे यांनी केले. कार्यक्रमास समता सैनिक दलाच्या सुजाता वासनिक, अंजली वडमारे एस. एस सोनवणे, बीजी दळवी, के.एस.वाघमारे, डी एम. राऊत, हॅप्पी वासनीक व अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य व परिसरातील उपासकांची उपस्थिती होती.

# ई-चलन थकवणे महागात पडणार

## वाहन जप्त करण्याचे सुप्रीम कोर्टाचे निर्देश

नवी दिल्ली : देशभरातील प्रलंबित ई-चलनांच्या वसुलीसाठी सर्वोच्च न्यायालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. केवळ हजारो-लाखो ई-चलने जारी करणे पुरेसे नसून, त्याद्वारे आकारण्यात आलेला दंड प्रत्यक्षात वसूल होणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, देशभरातील जारी ई-चलनांपैकी सुमारे ४९,१९४.०५ कोटींची रक्कम वसूल होणे बाकी आहे, तर २६,१७५.०५ कोटींची वसुली झाल्याचे सांगण्यात आले. प्रलंबित चलनांची संख्या वाढत असताना केवळ प्रकरणे संबंधित न्यायालयांकडे पाठविण्याची सध्याची पद्धत पुरेशी नसल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले.

बकाया ई-चलन असलेल्या वाहनांवर काय कारवाई होणार?





सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, यादृच्छिक तपासणीदरम्यान एखाद्या वाहनावर ई-चलनाची थकबाकी आढळल्यास आवश्यक कारवाई करून वाहन जप्त करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. तसेच दंडाची पूर्ण रक्कम भरेपर्यंत संबंधित वाहनाच्या विविध ऑनलाइन सेवांवर निर्बंध घालण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राचे (आरसी) नूतनीकरण, डुप्लिकेट ठउ आरसी , मालकाचा पत्ता बदलणे, फिटनेस प्रमाणपत्र आणि मालकी हस्तांतरण यांसारख्या सेवांवर रोक लावण्याचा समावेश आहे. संबंधित वाहनाला परिवाहन पोर्टल वर ब्लॅकलिस्ट करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

पीयुसी प्रमाणपत्रही मिळणार नाही. बकाया वाहतूक दंड पूर्णपणे भरला जाईपर्यंत संबंधित वाहनाला पीयुसी (पलूशन अंडर कंट्रोल ) प्रमाणपत्र देऊ नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांच्या बाबतीत ड्रायव्हिंग लायसन्सच्या नूतनीकरणावरही कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ही निर्देशावली एस. राजसीकरन विरुद्ध भारत संघ या रस्ता सुरक्षेशी संबंधित प्रकरणातील २८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या आदेशाशी संबंधित आहे. न्यायालयाने रस्ता सुरक्षा आणि मोटार वाहन कायद्यांची अंमलबजावणी केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष पातळीवर प्रभावीपणे होण्यावर भर दिला आहे.

# दिवेआगर समुद्रकिनारी मोठी दुर्घटना: सहलीसाठी आलेल्या ८ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

रायगड : कोकणातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनारी गुरुवारी (१ ऑक्टोबर) भीषण दुर्घटना घडली. पुणे जिल्ह्यातील आळंदी येथून सहलीसाठी आलेल्या ८ विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. समुद्रातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेमुळे दिवेआगर परिसरात खळबळ उडाली असून समुद्रकिनारी शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आळंदी येथील विनर्स अकॅडमी या खासगी शिकवणी वर्गातील विद्यार्थी सहलीसाठी दिवेआगर येथे आले होते. या सहलीत एकूण ४२ विद्यार्थी आणि २ शिक्षक, असे ४४ जण सहभागी झाले होते. समुद्रकिनारी गेल्यानंतर काही विद्यार्थी पोहोण्यासाठी समुद्राच्या पाण्यात उतरले. मात्र, पाण्याची खोली आणि समुद्राच्या प्रवाहाचा अंदाज न आल्याने काही विद्यार्थी पाण्याच्या प्रवाहात ओढले गेले.

या दुर्घटनेत ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. सर्व मृतदेह समुद्रातून बाहेर काढण्यात आले असून ते बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले आहेत. मृत विद्यार्थ्यांमध्ये सर्वजण अकरावीचे विद्यार्थी असल्याची प्राथमिक माहिती



समोर आली आहे.घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलिस आणि बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. महाकाली वॉटर स्पोर्ट्सच्या कर्मचाऱ्यांनीही मृतदेह बाहेर काढण्यासाठी मदत केली. स्थानिक नागरिकांनी बचावकार्याला सहकार्य केले. प्रशासनाकडून घटनास्थळी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असून दुर्घटनेच्या नेमक्या कारणाचा तपास सुरू आहे.

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडून जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क

दिवेआगर समुद्रकिनारी झालेल्या दुर्घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. त्यांनी दुर्घटनेची सविस्तर माहिती घेत बचावकार्य आणि मदतकार्याबाबत प्रशासनाकडून आढावा घेतला.

# दुष्काळाची झळ! महाराष्ट्रासह १८ राज्यांचा रेड झोनमध्ये समावेश

मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे. परतीच्या मान्सूनने पंजाब, हरियाणा व राजस्थानचा काही भाग ओलांडला आहे. तर महाराष्ट्रातून हा परतीचा मान्सूनचा प्रवास ५ ते १० ऑक्टोबरच्या दरम्यान होणार आहे. अशातच, बहुतांश वेळा परतीचा मान्सून महाराष्ट्रात पाऊस देऊन जातो. मात्र सध्या भारतावर प्रतिचक्रवाद स्थिती तयार झाली आहे. जी ढगांना एकत्र येऊ देत नाही. त्यामुळे परतीचा मान्सून महाराष्ट्रात पाऊस देण्याची शक्यता नसल्याचे नागपूर वेध शाळेने सांगितले आहे. परिणामी महाराष्ट्राच्या आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या वाट्याला निराशाच देणारा असल्याचे बोललं जात आहे. त्यामुळे एकीकडे महाराष्ट्र दुष्काळाच्या झळा सोसत असताना आगामी काळ अधिक अडचणींचा ठरणार असल्याची शक्यता आता अधिक वाढली आहे.

सध्या देशात ओडिसा हे एकमेव राज्य आहे, जेथे सरासरी पेक्षा जास्त पाऊस झाला आहे. तर महाराष्ट्रासह १८ राज्य असे आहे जेथे २० टक्क्यापेक्षा जास्त पावसाची तूट असल्याचे आकडेवारीनुसार समोर आलं आहे. परिणामी या १८ राज्यांना रेड झोनमध्ये टाकण्यात आले आहे. तिकडे पश्चिम विदर्भात तर परिस्थिती आणखी



बिकट आहे. अकोला आणि अमरावती जिल्ह्यात पावसाची तूट हि ४० टक्क्यापेक्षा अधिकवर पोहचली आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागात पाऊसच झाला नाही. सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसाचे चारही महिने कोरडेच गेले आहेत. दीड महिने तर राज्यातील अनेक भागात पावसाचा एक थेंबही पडला नाही. काही ठिकाणी पाऊस झाला, पण तोही समाधानकारक नव्हता. त्यामुळे राज्यात मोठा दुष्काळ पडला आहे.

हवामान खात्याच्या दाव्यानुसार, एक दशकानंतर राज्यात यंदा सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे. यावरुन राज्यातील संकट किती मोठं आहे, हे दिसून येतं. पाऊस कमी झाल्याने रब्बी पेरणीवरही संकट उभं राहिलं आहे. त्यामुळे बळीराजाचं टेन्शन वाढलं आहे. एक दशकानंतर राज्यात या वर्षी सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे. यंदा राज्यातील पावसाची सरासरी तूट १८ टक्के आहे. राज्यातील सर्वच विभागात यावर्षी पावसाची कमी जास्त प्रमाणात तुट निर्माण झाली आहे. मात्र, येणाऱ्या ५ ते ६ दिवसात राज्यात सर्वदूर पाऊस होण्याची कमी शक्यता. असं असलं तरी राज्यातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाचा सल्ला घेऊनच रब्बी हंगामात पेरणी करावी, असा सल्ला एस.डी. सानप यांनी दिला आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# संकटसमयी आष्टी तालुक्यातील जनतेच्या सदैव पाठीशी उभे राहणारे आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे देविदास आबा धस

## सत्य,समंजसपणा आणि माणुसकीची जपणूक हाच आबांचा जीवनमंत्र

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाच्या सुख-दुःखात कायम सहभागी होणारे, सर्वसामान्यांच्या अडचणी आपल्या समजून त्यावर मार्ग काढण्यासाठी सदैव पुढाकार घेणारे आणि गावपातळीवरच वाद-विवाद मिटवून सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असणारे आदरणीय 'आबा' म्हणून परिचित असलेले व्यक्तिमत्त्व आजही अनेकांच्या मनात आपुलकीचे स्थान टिकवून आहे. कोणताही वाद थेट पोलिस ठाण्यापर्यंत जाण्यापूर्वी तो समंजसपणे गावपातळीवरच कसा मिटेल, याचा विचार करणारे देविदास आबा धस हे माणुसकीला आणि सामाजिक बांधिलकीला प्राधान्य देतात.



कुणालाही आपल्या कृतीमुळे त्रास होऊ नये, कोणाचे नुकसान होऊ नये आणि गावातील संबंधांमध्ये कटुता निर्माण होऊ नये, याची ते सातत्याने काळजी घेत असल्याचे त्यांच्या सहवासातील नागरिक सांगतात. 'जे पोटात तेच ओठात' हा त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा पैलू मानला जातो. मनात एक आणि बोलण्यात दुसरे असे त्यांच्या स्वभावात नाही. ते स्पष्टवक्ते असून, प्रसंगी त्यांच्या बोलण्यात फटकळपणा जाणवला तरी त्यांच्या मनात मात्र कोणाबद्दलही द्वेष नसतो. मनाने निर्मळ, प्रेमळ आणि आपुलकीची भावना जपणारे आबा अनेकांच्या अडचणीच्या काळात आधार देण्यासाठी पुढे येतात. त्यामुळेच त्यांच्या स्पष्ट बोलण्यापेक्षा त्यांच्या मनातील प्रामाणिकपणा आणि माणुसकीला अधिक महत्त्व दिले जाते.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्वर्गवासी लोकनेते रामचंद्र धस दादा यांच्या स्वभावाची आणि विचारांची छबी अनेकांना पाहायला मिळते. माणसांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणे, संकटात धावून जाणे, अन्याय-अडचणीच्या प्रसंगी भूमिका घेणे आणि समाजात आपलेपणा निर्माण करणे, या गुणांमुळे आबांबद्दल नागरिकांमध्ये विशेष जिव्हाळा असल्याचे दिसून येते. अशा व्यक्तिमत्त्वावर कुणी खोटी टीका केली किंवा चुकीचे आरोप केले तरी त्याकडे दुर्लक्ष करून आपल्या मार्गावर ठाम राहणे, हाच योग्य मार्ग असल्याचे त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. यासाठी 'वर तोंड करून सूर्यावर थुंकल्यास ती थुंकी अखेरीस थुंकणाऱ्याच्याच तोंडावर पडते; मात्र त्यामुळे सूर्याचे तेज कमी होत नाही,' ही उपमा दिली जाते. त्याचप्रमाणे एखाद्या प्रामाणिक आणि चारित्र्यवान व्यक्तीवर केलेली खोटी टीका किंवा बदनामी त्याची प्रतिष्ठा कमी करू शकत नाही; उलट अशा टीकेचे परिणाम टीका करणाऱ्यावरच होतात, अशी भावना आबांच्या निकटवर्तीयांकडून व्यक्त केली जाते.

आबांनी नेहमीच सत्याची साथ दिली असून, पुढेही सत्याच्या मार्गावरच राहण्याची त्यांची भूमिका असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे कोण काय बोलते, कोण काय आरोप करते किंवा कोणत्या प्रकारची टीका करते, यापेक्षा आपण केलेले काम, लोकांशी असलेले नाते आणि संकटकाळात दिलेली साथ याला अधिक महत्त्व असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे, संकटाच्या काळात कोण आपल्या पाठीशी उभे राहते, याची जाणीव समाजाला असते. सुखाच्या काळात अनेक जण सोबत असतात; मात्र अडचणीच्या वेळी, अगदी अर्ध्या रात्रीही मदतीसाठी धावून येणाऱ्या व्यक्तीला समाज कधीही विसरत नाही. त्यामुळेच 'जे लोकांसाठी संकटसमयी उभे राहतात, त्यांच्यासाठीच जनता ठामपणे उभी राहते,' ही भावना आबांच्या बाबतीत प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामागील निर्मळ मन, सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा समंजस दृष्टिकोन आणि सामान्य माणसाच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची वृत्ती यामुळे 'आबा' हे नाव अनेकांच्या मनात विश्वासाचे आणि आपुलकीचे प्रतीक बनले आहे.



# संस्कार विद्यालयामध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात संपन्न

बीड प्रतिनिधी

येथील संस्कार विद्यालयात महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती निमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माध्यमिक विभागाचे सन्माननीय मु.अ. घाडगे एस. बी., प्राथमिक विभागाच्या मु .अ. श्रीमती .शोभाताई कुलकर्णी तसेच इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक परजणे सर आणि प्रमुख वक्त्या श्रीमती वर्षाताई डोळस,श्रीमती पानखडे व्ही.आर. उपस्थित होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन श्रीमती वाघ यांनी केले तर धर्माधिकारी एस. डी.. यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

# पुण्यातील एमपीएससी परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला धनंजय मुंडेंनी भेट देऊन दिला पाठिंबा

## विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक लावून सकारात्मक निर्णय होण्यासाठी प्रयत्न करणार - धनंजय मुंडे

पुणे (प्रतिनिधी) - राज्य लोकसेवा आयोगाच्या अध्यक्ष व सचिवांचा औषधं निरीक्षक परीक्षेतील गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर राजीनामा द्यावा यांसह विविध मागण्यांसाठी पुण्यात एमपीएससी परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या सुरू असलेल्या आंदोलनास आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी भेट देऊन पाठिंबा दिला.

आयोगाच्या अध्यक्ष व सचिवांचा राजीनामा तसेच परीक्षा पद्धतीत विविध सुधारण करून कालबद्ध कार्यक्रम आखणे, वार्षिक कॅलेंडर तयार करून त्याचे अनुसरण करणे, वर्णनात्मक परीक्षा पद्धतीत अभ्यासासाठी पुरेसा वेळ देणे, ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेणे, यांसह विविध न्याय्य मागण्यांच्या अनुषंगाने आपण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून चर्चा केली असून, पुढील आठवड्यात विद्यार्थी प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाला घेऊन मुंबई येथे मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन सदर बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी आपण प्रयत्न




व पाठपुरावा करणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हटले आहे.

परीक्षा व अन्य प्रक्रियेचे वार्षिक कॅलेंडर तयार केले जावे तसेच पेपरफुटी सारख्या गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, यासाठी आगामी अधिवेशनात विशेष कायदा आणला जावा, याबाबतही आपण या बैठकीत चर्चा करणार असल्याचे धनंजय मुंडे पुढे बोलताना म्हणाले. दरम्यान विद्यार्थ्यांच्या पाठीशी आपण उभे असून या आंदोलनाच्या माध्यमातून नक्कीच न्याय मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला यावेळी ओबीसी आंदोलक ड. मंगेश ससाणे, विद्यार्थी आंदोलक अरविंद वालेकर, मनोज पिंगळे, राम कदम, अनिल देवकाते, नितीन आंधळे, धुळदेव टेळे यांसह हजारो विद्यार्थी आंदोलक उपस्थित होते.

# रुग्णालयाच्या प्रवेश द्वारा समोरील रस्ता दुभाजक काढून रस्ता मोकळा करा; दुभाजका मुळे रुग्णसेवेला अडथळा

## जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन; रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र प्रवेश मार्गाची मागणी

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालया समोरील रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आलेल्या दुभाजका मुळे रुग्णवाहिका तसेच रुग्णांना रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत पोहोचताना अडचणी निर्माण होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.गंभीर रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करताना वेळ महत्त्वाचा असतो. त्यामुळे रुग्णालयाचा प्रवेशमार्ग अडथळा मुक्त ठेवावा,अशी मागणी किसान सभेचे बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डी.जी.तांदळे, सामाजिक कार्यकर्ते तथा महा एनजिओ फेडरेशनचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे.या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले आहे.विशेष म्हणजे यावेळी विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांची उपस्थिती होती रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील दुभाजकाची तातडीने पाहणी करून आवश्यक त्याठिकाणी मार्ग खुला करावा, अशी मागणी निवेदना तून करण्यात आली आहे.जिल्हा रुग्णालय हे बीड शहरासह जिल्ह्यातील नागरिकां साठी महत्त्वाचे शासकीय रुग्णालय आहे.अपघातग्रस्त, अत्यवस्थ तसेच गंभीर आजारी रुग्णांना उपचारासाठी येथे आणले जाते.अशा परिस्थितीत रुग्ण वाहिकेला रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत पोहोचण्यासाठी अनावश्यक वळसा घ्यावा लागल्यास उपचार सुरू होण्यास विलंब होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संयुक्त पाहणीची मागणी

सार्वजनिक बांधकाम विभाग,आरोग्य विभाग,वाहतूक पोलीस आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त पाहणी घेऊन रुग्णालय परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा तातडीने आढावा घ्यावा.रुग्णवाहिकां साठी २४ तास स्वतंत्र व थेट प्रवेशमार्ग उपलब्ध करून द्यावा. तसेच आवश्यकते नुसार दुभाजकाचा भाग हटवून रुग्णालयाचा मार्ग अडथळामुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी योग्य दिशादर्शक फलक,



वाहतूक नियोजन आणि सुरक्षा उपाय योजना कराव्यात.या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा,अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. विकास कामे नागरिकांच्या सुविधेसाठी असतात. मात्र रस्त्याच्या नियोजनामुळे रुग्णालयाच्या आपत्कालीन सेवेलाच अडथळा निर्माण होत असेल तर त्याचा तातडीने पुनर्विचार होणे आवश्यक आहे. रुग्णवाहिकेला रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापर्यंत विनाअडथळा पोहोचता आले पाहिजे,असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

# जालना जिल्ह्यात मंडळनिहाय चारा छावण्या तातडीने सुरू करा

## शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांचे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना निवेदन

मुंबई ब्युरो :- जालना जिल्ह्यात निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय चारा छावण्या तातडीने सुरू कराव्यात अशी मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केली.यासंदर्भात घुगे यांनी मुंबई येथील रामटेक बंगल्यावर जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन निवेदन साद केले.या वेळी जिल्ह्यातील पाणीटंचाई चाऱ्याची कमतरता आणि पशुपालकांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत त्यांनी पालकमंत्र्यांचे लक्ष वेधले.

जालना,बदनापूर,भोकरदन, जाफराबाद,अंबड, घनसावंगी, परतूर आणि मंठा या आठही तालुक्यांतील काही भागांत पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली आहे. नदी-नाले तलाव तसेच जलसाठ्यांमध्ये पुरेसा साठा नसल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच उपाययोजना करून पशुधनाचे संरक्षण करावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

मंडळनिहाय छावण्यांची मागणी आठही तालुक्यांमध्ये मंडळनिहाय किमान एक चारा छावणी सुरू करावी छावण्यांमध्ये जनावरांसाठी पुरेशा प्रमाणात चारा व स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे तसेच आवश्यक मूलभूत सुविधा निर्माण कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.पाणी आणि चाऱ्याची टंचाई अधिक असलेल्या भागात परिस्थितीचा आढावा घेऊन गरजेनुसार अतिरिक्त चारा छावण्या सुरू कराव्यात. तसेच जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन शेतकरी व पशुपालकांना आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी अशीही मागणी घुगे यांनी केली.

पशुधन हे शेतकरी कुटुंबांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार असल्याने चारा-पाण्याअभावी जनावरांचे हाल होऊ नयेत यासाठी प्रशासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे घुगे यांनी निवेदनात नमूद



केले.या वेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रवीण फुके पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव बोडखे पाटील आणि प्रगतिशील शेतकरी रामेश्वर दराडे उपस्थित होते.

# किरण जाधवची गुजरात येथे लेझर क्रिकेटसाठी निवड

## क्रीडा क्षेत्रात चौसाळ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा; सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

चौसाळा / वार्ताहर

चौसाळा येथील होतकरू खेळाडू किरण जाधव यांची गुजरात येथे होणाऱ्या लेझर क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे चौसाळा परिसराच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, कुटुंबीय, मित्रपरिवार, क्रीडाप्रेमी आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

किरण जाधव यांनी सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि उत्कृष्ट खेळाच्या जोरावर ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातून येत असतानाही त्यांनी क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, गुजरात येथे होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाल्याने त्यांच्या क्रीडा कारकिर्दीला नवी दिशा मिळणार आहे.

त्यांच्या या निवडीमुळे चौसाळा परिसरातील युवा खेळाडूंना प्रेरणा मिळणार असून, ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होणार आहे. योग्य संधी, मेहनत आणि मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील खेळाडूही मोठ्या स्तरावर आपली कामगिरी सिद्ध करू शकतात, हे किरण जाधव यांच्या निवडीने अधोरेखित झाले आहे.

चौसाळा प्रीमियर लीगचे अध्यक्ष डॉ. प्रशांत दादा जोगदंड यांनी किरण जाधव यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत, गुजरात येथील स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून चौसाळ्याचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा दिल्या.

डेंजर व पाटील क्रिकेट क्लबच्या वतीने तसेच संघाचे मार्गदर्शक मिलिंद सोनवणे, युवा नेते पंकज भैया शिंदे, चौसाळ्याचे उत्कृष्ट फलंदाज वैभव भैया सोनवणे यांच्यासह बापूजी घोडके,



अप्सरा अंसरी, तेजस वाघमारे, पवन आवताडे, राज तोडेकर, दिशांत शेख, शाहिद पठाण, अरबाज मुलानी, गणेश पिंपळे, अक्षय बोबडे, स्वनिल शिंदे, अजय खोबरे, ऋषी तोडकर, रोहन तोडकर, कामु मुजावर, शंतनू क्षीरसागर तसेच सर्व खेळाडूंनी किरण जाधव यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# मराठवाडा पदवीधर निवडणूक काँग्रेसने लढवावी

## जिल्हाध्यक्षांची एकमुखी मागणी

मुंबई ब्युरो :- दि.१ आगामी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक काँग्रेस पक्षाने पूर्ण ताकदीने लढवावी अशी एकमुखी मागणी मराठवाड्यातील काँग्रेसच्या सर्व जिल्हाध्यक्षांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडे केली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांची भेट घेऊन पदवीधर निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

खासदार डॉ. कल्याण काळे आणि खासदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या भेटीत मराठवाड्यातील काँग्रेसची संघटनात्मक स्थिती पदवीधर मतदारांशी असलेला संपर्क आणि आगामी निवडणुकीच्या तयारीबाबत जिल्हाध्यक्षांनी आपली भूमिका मांडली.

मराठवाड्यात काँग्रेसची संघटनात्मक बांधणी मजबूत असून पदवीधर मतदारांमध्ये पक्षाच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग असल्याचे जिल्हाध्यक्षांनी प्रभारी डॉ. प्रसाद यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक काँग्रेसने स्वतःच्या चिन्हावर लढवावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

जिल्हानिहाय संघटन मजबूत करण्यावर भर

जिल्हाध्यक्ष कल्याण दळे यांनी काँग्रेसच्या संघटनात्मक ताकदीचा दाखला देत पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हानिहाय नियोजन करण्याची तयारी असल्याचे सांगितले.

मराठवाड्यात काँग्रेसची संघटनात्मक ताकद मोठी आहे. पदवीधर मतदारांमध्ये काँग्रेसच्या विचारांना मानणारा मोठा वर्ग आहे. त्यामुळे ही निवडणूक पक्षाने पूर्ण ताकदीने लढवावी. जिल्हानिहाय संघटन मजबूत करून पदवीधर मतदारांपर्यंत पोहोचण्याची आमची पूर्ण तयारी आहे.पदाधिकारी कार्यकर्त्यांना सक्रिय करण्याची भूमिका

पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पक्षासाठी महत्त्वाची असल्याने संघटनेतील सर्व स्तरांवरील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सक्रिय करण्यावर भर देण्यात यावा, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.मतदार नोंदणीपासून प्रचार यंत्रणा उभारणीपर्यंत नियोजनबद्ध तयारी करण्याची गरजही यावेळी व्यक्त करण्यात आली.

मराठवाड्यातील सर्व जिल्हाध्यक्षांनी एकमुखाने निवडणूक लढविण्याची मागणी केल्याने आता पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व याबाबत कोणता निर्णय घेते याकडे काँग्रेस कार्यकर्त्यांसह पदवीधर मतदारांचे लक्ष लागले आहे.

# सातबारा उतारे आणि महत्त्वाची कागदपत्रे दाखवत माजी आ.बाळासाहेब आजबेंचा पलटवार

## कुटुंबाकडे केवळ आठ एकर देवस्थान जमीन असल्याचा दावा ;बदनामी झाल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा

आष्टी - (प्रतिनिधी) श्रीराम देवस्थानच्या जमिनीच्या कथित व्यवहारावरून आष्टी तालुक्यातील राजकीय वातावरणात आरोप-प्रत्यारोप सुरू असताना माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी प्राजक्ताताई धस यांच्या टीकेला प्रत्युत्तर देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मी सौ. रुक्मिणीबाई आणि श्री. भाऊसाहेब आजबे यांच्या पोटी जन्माला आलो आहे; एखाद्या जत्रेतून किंवा बाजारातून हाताला धरून आणलेला मुलगा नाही, अशा शब्दांत त्यांनी आपल्या वारसदारपणाबाबत करण्यात आलेल्या वक्तव्याला उत्तर दिले. श्रीराम देवस्थानच्या जमिनीबाबत आपल्यावर राजकीय हेतूने आरोप केले जात असून, बदनामीकारक आरोप करणाऱ्यांविरोधात कायदेशीर सल्ला घेऊन अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिराळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत माजी आमदार बाळासाहेब आजबे बोलत होते. यावेळी त्यांनी देवस्थानच्या जमिनीशी संबंधित काही कागदपत्रे पत्रकारांसमोर सादर करून आपली बाजू मांडली. काही दिवसांपूर्वी बीड येथे माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळी प्रश्नांवर मोर्चा काढण्यात आला होता. या वेळी आजबे यांनी आष्टी तालुक्यातील जमिनींच्या कथित गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर भाष्य करत साहेब, मॅडमला आवरा, असे वक्तव्य केले होते. त्यावर प्राजक्ताताई धस यांनी, बाळासाहेब आजबे हे जर भाऊसाहेब आजबे यांचे वारसदार असतील, तर त्यांनी केलेले आरोप सिद्ध करून दाखवावेत, असे आव्हान दिले होते. या पार्श्वभूमीवर आजबे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

श्रीराम देवस्थानच्या जमिनीबाबत बोलताना आजबे यांनी सांगितले की, श्रीराम देवस्थान ट्रस्टची नोंदणी १९६५ मध्ये झाली असली, तरी त्यापूर्वीपासून म्हणजे अनेक वर्षांपासून देवस्थानच्या जमिनीवर शेतकरी शेती करत आहेत. देवस्थानच्या सुमारे ७०० एकर जमिनीवर २७० शेतकरी शेती करत असल्याचा दावा त्यांनी केला. यापैकी आपल्या कुटुंबातील तिन्ही भावांकडे मिळून केवळ आठ एकर जमीन असल्याचे सांगत, नियमानुसार शेतसारा भरला जात असून त्याच्या अधिकृत पावत्या आपल्याकडे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या जमिनीबाबत देवस्थानकडून कोणतीही तक्रार नसल्याचेही आजबे यांनी सांगितले.

आपल्या कुटुंबाकडे ३५० एकर देवस्थानची जमीन असल्याचा आरोप पूर्णपणे चुकीचा असल्याचे सांगत आजबे यांनी यापूर्वी विधान परिषदेत या विषयावर दोन वेळा लक्षवेधी सूचना उपस्थित झाल्याचा दावा केला. संबंधित प्रकरणांमध्ये तथ्य आढळले नसल्याने त्या निकाली निघाल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे केवळ राजकीय आरोप करण्याऐवजी संबंधितांनी उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे वस्तुस्थिती तपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आजबे यांनी आमदार सुरेश धस व त्यांच्या कुटुंबीयांच्या देवस्थानांशी संबंधित भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले. पिंपळेश्वर संस्थानचे अध्यक्ष व मच्छिंद्रनाथ देवस्थानचे सदस्य आमदार सुरेश धस असून, विठोबा देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्ष प्राजक्ताताई धस असल्याचा उल्लेख करत त्यांनी या देवस्थानांच्या जमिनींबाबतही प्रश्न उपस्थित केले. दादेगाव येथील श्रीराम देवस्थानच्या जमिनीबाबत काही व्यक्तींचे हितसंबंध असू शकतात, असा संशय त्यांनी व्यक्त केला. तसेच काही जमिनी निकटवर्तीयांच्या नावावर खरेदी केल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र या आरोपांबाबत संबंधित पक्षाची भूमिका आणि अधिकृत कागदपत्रांच्या आधारे वस्तुस्थिती तपासणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होते.

मी आमदार धस यांचा कार्यकर्ता नाही. त्यामुळे मी कसे वागावे, याचा सल्ला प्राजक्ताताई धस यांनी देऊ नये, असा टोला लगावत आजबे यांनी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांच्या जमिनीशी संबंधित तक्रारींबाबतही भूमिका मांडली. काही शेतकऱ्यांना जमिनीच्या प्रश्नांमुळे अडचणी येत असल्यास त्यांनी घाबरून न जाता कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन त्यांनी केले. तालुक्यातील पीडित शेतकऱ्यांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे राहणार असून, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



आपल्याविरोधात करण्यात येणारे आरोप पुराव्यांसह सिद्ध करावेत, असे आव्हान देतानाच खोटी अथवा बदनामीकारक माहिती प्रसारित झाल्यास कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाईल, असे आजबे यांनी स्पष्ट केले. देवस्थानच्या जमिनीशी संबंधित सर्व व्यवहारांची वस्तुनिष्ठपणे तपासणी होऊन सत्य परिस्थिती समोर यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या पत्रकार परिषदेमुळे आष्टी तालुक्यातील देवस्थानच्या जमिनींच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना पुन्हा एकदा वेग आला आहे.



# महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानामध्ये

## लातूर जिल्ह्यात ७४ अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा

लातूर प्रतिनिधी

महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या जमिनीशी संबंधित महसुली दाव्यांचा जलद आणि कायमस्वरूपी निपटारा करण्यासाठी लातूर जिल्ह्यात ३० ऑक्टोबर रोजी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ७४ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या निर्देशानुसार लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड आणि अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ३० सप्टेंबर २०२६ रोजी लातूर जिल्ह्यामध्ये मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) आणि अपर जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्यात आले.

या महसूल लोक अदालतीमध्ये एकूण ७४ प्रकरणांचा दोन्ही पक्षकारांच्या संमतीने आणि तडजोडीने निपटारा करण्यात आला. महसूल विभागामार्फत अशा प्रकारच्या लोक अदालतीचे आयोजन यापुढेही नियमितपणे करण्यात येणार असून, नागरिकांनी आपली प्रलंबित प्रकरणे कायदेशीर चौकटीत राहून तडजोडीने निकाली काढण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## पीकपंचनामे वेळेत पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी अफवांवर

# विश्वास न ठेवता यंत्रणांना सहकार्य करावे - जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष

आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी, धावडवाडी येथे पिकांची पाहणी

सांगली (जि. मा. का.)

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार यावर्षी आटपाडी तालुक्यात खरीप हंगाम २०२६ साठीची कळ एक लागू झाली असून, दुष्काळी परिस्थितीमध्ये शासनाच्या आदेशानुसार महसूल, कृषी व अन्य संबंधित यंत्रणा जलद गतीने कार्यवाही करत आहे. ही कार्यवाही वेळेत पूर्ण होण्यासाठी शेतकरी बांधवांनी यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी केले.

आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी, धावडवाडी येथे दुष्काळ परिस्थितीची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विटा उपविभागीय अधिकारी डॉ. विक्रम



बांदल, तहसीलदार शितल बंडगर, तालुका कृषी अधिकारी श्री. कौलगे, गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, बाधित खातेदार तसेच महसूल व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष म्हणाले, शासनाच्या सूचनेप्रमाणे १० दिवसात पीक पंचनाम्याचे काम पूर्ण करायचे आहे. मात्र इथे काही स्थानिक शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे विविध कागदपत्रांची मागणी होत असल्याचे निदर्शनास आणले आहे. त्यांना अशा अफवांकडे लक्ष देऊ नये, असे आवाहन करून त्यांनी शेतकऱ्यांनी फक्त आधार कार्ड, ७/१२ उतारा, बँक पासबुक झेरॉक्स आणि फार्मर आयडी एवढीच कागदपत्रे द्यायची असल्याचे स्पष्ट केले. शेतकऱ्याला वैयक्तिक काहीच करायची गरज नसून, पीकपंचनाम्याची सर्व कार्यवाही शासकीय यंत्रणा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, झालेले नुकसान तसेच पिण्याचे पाणी व चाऱ्याबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या.





# शिक्षण क्षेत्रात योगेश्वरी शिक्षण संस्थेचे महत्वपूर्ण योगदान -अभिनेत्री निलम शिर्के

अंबाजोगाई(प्रतिनिधी )

मराठवाडा आणि त्या बाहेर योगेश्वरी शिक्षण संस्थेने शैक्षणिक आणि सामाजिक जडणघडणीत दिलेले ऐतिहासिक योगदान अत्यंत महत्वपुर्ण आहे.असे मत मराठी चित्रपट सृष्टीतील प्रख्यात अभिनेत्री तथा महाराष्ट्र राज्य बाल रंगभूमीच्या अध्यक्षा निलम शिर्के यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेस त्यांनी सदिच्छा भेट दिली त्यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर,उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,प्रा.डॉ. गणेश पिंगळे,प्रा.डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ प्रशांत देशमुख डॉ ज्ञानेश्वर सोनवणे, डॉ. संकेत तोरंबेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना निलम शिर्के म्हणाल्या की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देऊन सक्षम पिढी घडवण्याचे काम स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या योगेश्वरी शिक्षण संस्थेने केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

निलम शिर्के यांनी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक यांच्याशी संवाद साधून संस्थेच्या विविध शैक्षणिक उपक्रमांविषयी व सुरू असलेल्या कार्याविषयी सविस्तर चर्चा केली. निलम शिर्के व उपस्थित मान्यवरांचे यो.शि. वतीने स्वागत करण्यात आले. संस्थेच्या वतीने उभारलेल्या पू. स्वामी रामानंद तीर्थ, हैद्राबाद मुक्ती संग्राम स्थळाचीही त्यांनी पाहणी केली.

# ५ हजारांचा दर जाहीर करा मगच गाळप सुरू करा

**माँ बागेश्वरी कारखान्याविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक मागील हंगामातील ५०० रुपये अंतिम वाढबिलासह २३३ रुपयांची एफआरपी थकबाकी देण्याची मागणी**

घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे :-

आगामी ऊस गाळप हंगाम सुरू होण्यापूर्वीच ऊसदराचा मुद्दा पेटला असून परतूर तालुक्यातील श्रद्धा एनर्जी अर्थात माँ बागेश्वरी साखर कारखाना प्रशासनाविरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. आगामी हंगामासाठी प्रतिटन ५ हजार रुपये दर जाहीर केल्याशिवाय कारखान्याची धुराडी पेटू देणार नाही असा इशारा संघटनेने दिला आहे.

मागील हंगामात गाळप झालेल्या उसाचे प्रतिटन ५०० रुपये अंतिम वाढबिल तातडीने अदा करावे तसेच २०२४-२५ हंगामातील प्रतिटन २३३ रुपयांची थकीत एफआरपी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांसाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी २ ऑक्टोबर रोजी कारखाना प्रशासनाला निवेदन दिले.थकीत रक्कम ठेवून नवा हंगाम नको

मागील हंगामातील शेतकऱ्यांची देणी प्रलंबित असताना आगामी गळीत हंगाम सुरू करण्याचा प्रयत्न करू नये अशी भूमिका संघटनेने स्पष्ट केली. शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशांचा हिशेब आधी मगच कारखान्याचा गाळप हंगाम



असा थेट संदेश संघटनेने कारखाना प्रशासनाला दिला.

खते,औषधे,मजुरी,मशागत, सिंचन आदींच्या वाढत्या खर्चामुळे ऊस उत्पादनाचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाढलेल्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणे गरजेचे असल्याचे संघटनेने म्हटले आहे. साखरेला मिळणाऱ्या चांगल्या दराचा लाभ ऊस उत्पादकांनाही मिळावा अशी मागणी करण्यात आली.

तीन मागण्या निर्णय तातडीने घेण्याची मागणी

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने प्रशासनासमोर तीन प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. मागील हंगामातील प्रतिटन ५०० रुपये अंतिम वाढबिल २०२४-२५ मधील प्रतिटन २३३ रुपये थकीत एफआरपी आणि आगामी हंगामासाठी प्रतिटन ५ हजार रुपये ऊसदर जाहीर करावा अशी मागणी आहे.अन्यथा आंदोलनाचा इशारा या मागण्यांवर कारखाना प्रशासनाने ठोस निर्णय न घेतल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना आंदोलनाची भूमिका घेणार असल्याचा इशारा देण्यात आला. त्यामुळे आगामी गळीत हंगामाच्या तोंडावर माँ बागेश्वरी कारखाना प्रशासन आणि ऊस उत्पादक शेतकरी संघटना यांच्यातील संघर्षाची ठिणगी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

यावेळी तालुकाध्यक्ष सतीश निर्मळ, युवा जिल्हाध्यक्ष नामदेव खोसे, गणेश राजबिंडे, भरत काळे, बाळासाहेब बिडवे, श्रीकृष्ण निर्वळ, लक्ष्मण गवळी, धोंडीभाऊ गंडे, भाऊराव काळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# दुष्काळातही कान्होबाचीवाडीच्या शेतकऱ्याची कपाशीत क्रांती!

## एका कपाशीच्या झाडाला तब्बल १०० ते १२५ बोंडे; पीक पाहणीसाठी ५०० हून अधिक शेतकऱ्यांची उपस्थिती

मानूर प्रतिनिधी ह्व

अत्यल्प पावसामुळे शिरूर कासार तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना, मर्यादित पाणीसाठा आणि प्रतिकूल हवामानावर मात करत कान्होबाचीवाडी येथील शेतकरी अशोक कचरू मोरे यांनी कपाशीच्या पिकातून आशेचा किरण दाखवून दिला आहे. अवघ्या काही फवारण्या, ठिबक सिंचन, शेणखताचा वापर आणि काटेकोर पीक व्यवस्थापनाच्या जोरावर त्यांच्या कपाशीच्या एका झाडाला तब्बल १०० ते १२५ बोंडे लागल्याचे दिसून येत आहे. एका बोंडाचे सरासरी वजन ९ ते १० ग्रॅम असल्याने हा कपाशीचा प्लॉट परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.

या उल्लेखनीय कपाशी पिकाची पाहणी करण्यासाठी कान्होबाचीवाडी येथे विशेष पीक पाहणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पाणी फाउंडेशनच्या विविध महिला गटांतील ५०० हून अधिक महिला शेतकरी, तसेच परिसरातील पुरुष शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला शेतकऱ्यांच्या हस्ते कपाशीच्या प्लॉटची फीत कापून उद्घाटन करण्यात आले. प्रत्यक्ष शेतात जाऊन कपाशीची वाढ, झाडावरील बोंडांची संख्या, बोंडांचा आकार आणि पिकाची स्थिती पाहिल्यानंतर उपस्थित शेतकऱ्यांनी आश्चर्य व्यक्त करत अशोक मोरे यांच्या प्रयोगाचे कौतुक केले.

३६ गुंठ्यांत कपाशीची लागवड

अशोक मोरे यांनी महिको कंपनीचे ७३५१ वाणाचे बियाणे निवडून आपल्या ३६ गुंठे क्षेत्रावर कपाशीची लागवड केली. १० जून रोजी लागवड करण्यात आली. पिकाला ठिबक सिंचनाची सुविधा देण्यात आली असून, जमिनीची सुपीकता आणि पिकाची वाढ सुधारण्यासाठी शेणखताचा वापर करण्यात आला. आतापर्यंत पिकावर केवळ तीन फवारण्या करण्यात आल्या असून, एका वेचणीचे काम पूर्ण झाले आहे.

योग्य वाणाची निवड, लागवडीचे नियोजन, ठिबक सिंचन, शेणखताचा वापर आणि वेळोवेळी केलेले पीक व्यवस्थापन यामुळे कपाशीची झाडे जोमदार वाढली असून मोठ्या प्रमाणात बोंडधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

एका झाडाला १०० ते १२५ बोंडे

या कपाशीच्या प्लॉटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे एका झाडाला १०० ते १२५ बोंडे लागलेली पाहायला मिळत आहेत. त्याचबरोबर एका बोंडाचे वजन सरासरी



९ ते १० ग्रॅम भरत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीतही एवढ्या मोठ्या प्रमाणात बोंडधारणा झाल्याने हा प्लॉट शेतकऱ्यांसाठी चर्चेचा विषय ठरला आहे.

अशोक मोरे यांनी आतापर्यंत झालेली वाढ, बोंडधारणा आणि पहिल्या वेचणीचा अनुभव लक्षात घेता ३६ गुंठे क्षेत्रातून सुमारे १९ ते २१ क्विंटल कपाशीचे उत्पादन अपेक्षित असल्याचा विश्वास व्यक्त केला.

महिला शेतकऱ्यांची मोठी उपस्थिती

या पीक पाहणी कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पाणी फाउंडेशनच्या विविध महिला गटांतील ५०० हून अधिक महिला शेतकऱ्यांची उपस्थिती. महिला शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन कपाशीची पाहणी केली. दुष्काळी परिस्थितीत कमी पाण्यात चांगले पीक घेण्यासाठी ठिबक सिंचन, सेंद्रिय घटकांचा वापर, योग्य वाण आणि पीक व्यवस्थापन किती महत्त्वाचे आहे, याची माहिती यावेळी घेण्यात आली.

महिला शेतकऱ्यांनी कपाशीच्या प्लॉटची फीत कापून उद्घाटन करत या प्रयोगाचे कौतुक केले. प्रतिकूल परिस्थितीतही मेहनत, नियोजन आणि योग्य तंत्रज्ञानाच्या माध्यमातून चांगले उत्पादन घेता येऊ शकते, असा विश्वास या पाहणीमुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला.

महिको कंपनीसह कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

कपाशीची लागवड आणि पीक व्यवस्थापनाच्या काळात महिको कंपनीच्या प्रतिनिधींनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच निकीता ग्रो एजन्सीचे संचालक चंद्रकांत बेदरे यांनीही पीक व्यवस्थापनासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य केले.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करत ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पिकाला आवश्यक तेवढे पाणी देणे, शेणखताचा वापर करणे, योग्य वाणाची निवड आणि वेळेवर पीक व्यवस्थापन करणे या बाबींमुळे कपाशीच्या पिकाला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

उपस्थित मान्यवर

या पीक पाहणी कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी अमृत गांगार्डे, ज्येष्ठ नेते कल्याण तांबे, कृषी सहाय्यक क. पवळ, माजी सभापती निवृत्ती बेदरे, कोळवाडीचे सरपंच नारायण मानकर,देविदास नेटके, महिकोचे विभागीय अधिकारी प्रमोद भोसले, सुधाकर नेटके, लक्ष्मण नेटके, शिवाजी तुपे, प्रगतशील शेतकरी जगन्नाथ गाडेकर, बद्रीशेठ तांबे, विष्णू बेदरे, प्रदीप गुजर, डॉ. अशोक पाचपुते यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळाच्या छायेत असलेल्या शिरूर कासार तालुक्यात अशोक मोरे यांच्या कपाशीच्या पिकाने शेतकऱ्यांना नवी उमेद दिली आहे. पाणी कमी असले तरी नियोजन कमी पडता कामा नये, हा संदेश त्यांच्या प्रयोगातून मिळत असून, योग्य वाण, ठिबक सिंचन, शेणखत, पीक व्यवस्थापन आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांचा योग्य मेळ साधल्यास दुष्काळी परिस्थितीतही कपाशीचे चांगले उत्पादन घेता येऊ शकते, हे या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे.

# आईच्या स्मृतींना उजाळा देत विविध उपक्रमांनी रंगणार 'लाडकी आई' स्मृती सोहळा.!

## सेफपूर येथे स्व. राजूबाई सोनाजी घोडके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'लाडकी आई' कार्यक्रमाचे आयोजन

बीड /प्रतिनिधी

आई म्हणजे मायेचा अथांग सागर तिच्या कुशीत मिळणारी ऊब, तिच्या शब्दांतून मिळणारा आधार आणि तिच्या संस्कारांची शिदोरी आयुष्यभराची असते. अशाच मायेच्या आणि संस्कारांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी बालाघाट प्रतिष्ठान, जिल्हा बीड यांच्या वतीने स्व. राजूबाई सोनाजी घोडके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'लाडकी आई' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सेफपूर ता. जि. बीड येथे हा भावनिक आणि सामाजिक उपक्रम विविध कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. आईच्या आठवणींना केवळ श्रद्धांजली न वाहता तिच्या विचारांचा, संस्कारांचा आणि ममतेचा जागर करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या निमित्ताने वक्तृत्व व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांसाठी आईच्या प्रेमापासून ते बदलत्या काळातील आईची भूमिका, आई-मुलांचे नाते, आईचे संस्कार आणि तिचे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व



अशा विविध विषयांवर स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील आईविषयीच्या भावना शब्दरूपाने व्यक्त होणार आहेत. यासोबतच महिला आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आशा हॉस्पिटल, बीड येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या आरोग्याची तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

तसेच 'गंगापूजनाचा कार्यक्रम' आयोजित करण्यात आला असून, यानिमित्ताने बापूसाहेब शिंदे (मराठा सेवा संघ जिल्हा प्रमुख) यांचे आई या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमात प्रमुख अतिथींच्या मार्गदर्शनासह बक्षीस वितरणही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, ह.भ.प. हरीहर भारती महाराज, ह.भ.प. नाना महाराज कदम आणि ह.भ.प. विठ्ठलराव लोंढे महाराज यांचे आशीर्वाद लाभणार आहेत. श्री. नामदेव सोनाजी घोडके व समस्त घोडके परिवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम आईच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन करणारा ठरणार आहे. आईच्या स्मृतींना अभिवादन करत समाजातील प्रत्येक आईच्या त्यागाचा आणि ममतेचा सन्मान करणाऱ्या या 'लाडकी आई' कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आरटीओ साहेब रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी

# अधिकृत रिक्षा चालकांची नियुक्ती करावी - नवनाथअण्णा शिराळे पाटील

बीड प्रतिनिधी

सध्या बीड ते पुणे रेल्वे सुरू झाली असून शहरांमधून बीड रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी अनेक रिक्षावाले बेसुमार नागरिकांकडून भाडे घेत असून आपली पोळी भाजत आहेत. अनेक प्रवाशांच्या हातातील अंगठ्या पैसे पाकीट पैसे भामटे रिक्षावाले चोरटे हिसकावून घेत आहेत. रात्रीच्या वेळी काढून घेत असल्याचे सध्या समोर येत आहे. याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे आरटीओ साहेब यांनी बीड शहरातील अधिकृत रिक्षावाल्यांना बॅच बिल्ले देऊन पास देऊन त्यांना ड्रेस देऊन असे पंचवीस पास रिक्षावाल्यांना देऊन २५ रिक्षावाल्यांचे अधिकृतपणे त्यांच्या गळ्यामध्ये आयडी कार्ड देऊन रेल्वे स्टेशन कडे जाण्यासाठी व्यवस्था करावी असे प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड जिल्हा वाहतूक शाखेचे वैभव पाटील साहेब यांनी देखील आपले कर्तुत्व अतिशय



उत्कृष्टपणे वाहतूक शाखेच्या माध्यमातून संपूर्ण बंद बीड जिल्ह्यामध्ये वाहतूकची शिस्त काय असते ते दाखवून दिले आहे. म्हणून परत एकदा त्यांनी देखील या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे त्यांनी देखील बीड शहरांमधून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रिक्षा वाल्यांच्या बाबतीमध्ये ते किती भाडे घेतात कशाप्रकारे प्रवाशांना टार्गेट करतात हे पाहणे देखील गरजेचे आहे असे देखील प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सांगितले आहे.

# एकलव्य विद्यालयाचा विद्यार्थी योगेश मासाळकर विभागस्तरीय ज्यूदो स्पर्धेत प्रथम

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

मानूर प्रतिनिधी ह्न

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विभागस्तरीय शालेय ज्यूदो स्पर्धेत *एकलव्य विद्यालय, शिरूर कासारचा विद्यार्थी योगेश संजय मासाळकर* याने आपल्या उत्कृष्ट खेळकौशल्याचे प्रदर्शन करत *प्रथम क्रमांक पटकावला*. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची *राज्यस्तरीय ज्यूदो स्पर्धेसाठी निवड* झाली आहे.योगेशने स्पर्धेत जिद्द, शिस्त, आत्मविश्वास आणि उत्कृष्ट तंत्रकौशल्याचे दर्शन घडवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्याच्या या यशामुळे एकलव्य विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



योगेशच्या यशाबद्दल *एकलव्य विद्यालयाचे मार्गदर्शक प्रा. सचिन सानप सर, संस्थेचे अध्यक्ष श्री. नवनाथ नाना सानप, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी* यांनी त्याचे अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

एकलव्य विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा, सांस्कृतिक आणि विविध क्षेत्रांत प्रोत्साहन दिले जाते. योगेशचे हे यश विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले असून, राज्यस्तरीय स्पर्धेतही तो उल्लेखनीय कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या मागणीसाठी परळीत माकपची निदर्शने

परळी / प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या कथित मनमानी कारभाराच्या निषेधार्थ आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून तात्काळ हटवण्याच्या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या (माकप) वतीने परळीत निदर्शने करण्यात आली. देशभरात पाच डाव्या पक्षांनी पुकारलेल्या आंदोलनाचा एक भाग म्हणून परळीत हे आंदोलन करण्यात आले असून, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता टिकवण्याची मागणी यावेळी करण्यात आली.तीनपैकी दोन निवडणूक आयुक्तांनी मतदार नोंदणी, मतदारांची नावे वगळणे आणि 'विशेष सखोल पुनरावलोकन' (डखठ) प्रक्रियेच्या अंमलबजावणीवर आक्षेप नोंदवले आहेत. इतर आयुक्तांच्या संमतीशिवाय निर्णय घेतले जात असल्याचा आणि मतदारांच्या डेटाबेसचे केंद्रीकरण केले जात असल्याचा आरोप करत, यामुळे




निवडणूक व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याचे माकपच्या नेत्यांनी म्हणणे असून ज्ञानेश कुमार यांना मुख्य निवडणूक आयुक्त पदावरून तात्काळ हटविण्यात यावे, सदोष डखठ प्रक्रिया तात्काळ थांबवावी आणि मतदार यादीतून चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या सर्व नागरिकांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करावेत, आयोगाचे स्वतंत्र, पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीचे कामकाज पुन्हा प्रस्थापित करावे, सर्वोच्च न्यायालयाने सुचविल्याप्रमाणे निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यासाठी पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांच्या समावेशाची निवड समिती नेमावी याकरिता शहीद भगतसिंग यांच्या जयंतीपासून (२८ सप्टेंबर) ते महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) देशभरात डाव्या पक्षांकडून हा निषेध सप्ताह पाळण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर परळीत झालेल्या या निदर्शनांमध्ये माकपचे जिल्हा सचिव कॉ.अजय बुरांडे, सिटुचे जिल्हाध्यक्ष कॉ.बी.जी खाडे, जेष्ठ नेते पी एस घाडगे, कॉ मुरलीधर नागरगोजे, कॉ.पांडुरंग राठोड, कॉ भगवान बडे, कॉ सुदाम शिंदे, कॉ. किरण सावजी, श गंगाधर पोटभरे, श्रीकांत मांडे, कॉ. विष्णू देशमुख, पप्पु देशमुख, कॉ मदन वाघमारे कॉ जालिंदर गिरी, कॉ राधाकिशन जाधव यांच्यासह पुरोगामी आणि डाव्या चळवळीचे अनेक नेते,

# दुष्काळसदृश स्थितीत शेतकऱ्यांसाठी प्रशासनाचा संवादाचा हात

जिल्ह्यातील ८६० गावांत शेतकरी संवाद सभा समस्या जाणून घेत योजनांची माहिती

जालना शेख फारुक :-

दुष्काळसदृश परिस्थितीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती थेट गावपातळीवर पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील तब्बल ८६० गावांत शेतकरी संवाद सभा घेण्यात आल्या. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या सूचनेनुसार राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे प्रशासन आणि शेतकरी यांच्यात थेट संवादाचे व्यासपीठ निर्माण झाले.

दुष्काळसदृश परिस्थितीत शेतीसमोर निर्माण झालेल्या अडचणी पिकांचे नुकसान चाऱ्याची उपलब्धता तसेच शासनाकडून मिळणाऱ्या मदतीबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. त्याचबरोबर विविध शासकीय योजना मदत व कल्याणकारी उपक्रमांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तहसीलदार तालुका कृषी अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्या नियोजनातून या सभा घेण्यात आल्या. गावातील शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या स्थानिक समस्या शेतीविषयक अडचणी आणि प्रलंबित प्रश्न जाणून घेण्यात आले.

पिकांचे नुकसान चाऱ्याची उपलब्धता यावर चर्चा

सभांमध्ये पीक नुकसान भरपाई चारा उपलब्धता आणि दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना याबाबत माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांनीही आपल्या गावातील परिस्थिती शेतीसमोरील अडचणी आणि आवश्यक मदतीबाबत अधिकाऱ्यांसमोर भूमिका मांडली.गावपातळीवरील माहिती प्रशासनाच्या हाती

८६० गावांत एकाच उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद साधल्याने जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा गावनिहाय आढावा घेण्यास प्रशासनाला मदत झाली आहे.शेतकरी संवाद सभांमधून समोर आलेल्या समस्या व मागण्यांच्या आधारे




आवश्यक प्रशासकीय कार्यवाही आणि उपाययोजना करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर आणि गावपातळीवर संवाद साधल्याने त्यांच्या अडचणी समजून घेण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे.

# ज्योती अरुण पटाईत यांचं निधन

बीड /प्रतिनिधी

बीडच्या शिवाजीनगर भागातील रहीवाशी तथा जिल्हा न्यायालय बीड येथील हेड बीलीफ अरूण पटाईत यांच्या पत्नी ज्योती पटाईत यांचं शुक्रवारी (दि.२) पहाटेच्या सुमारास ह्रदय विकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्या ५५ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर बीड येथील संत भगवानबाबा प्रतिष्ठान स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील वकील, डॉक्टर, पत्रकार यांच्याह सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, एक मुलगा, सून, जावाई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा राख सावडण्याचा कार्यक्रम रविवारी सकाळी होणार असल्याचे नातेवाईकांनी कळवले.



ज्योती पटाईत या अत्यंत मनमिळावू, धार्मिक वृत्तीच्या आणि कायम सुख दुःखात कामी येणार्या म्हणून सर्वत्र परिचित होत्या. कार्यारंभ यु ट्यूब चॅनेलच्या अँकर अनुजा पटाईत यांच्या त्या आई होत. पटाईत परिवाराच्या दुःखात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.



**रोहिलागड प्रतिनिधी :-**

**अंबड तालुक्यातील रोहिलागड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती गुरुवारी दि.२ उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.महात्मा गांधी यांनी सत्य अहिंसा आणि स्वच्छतेचा संदेश देत देशाला नवी दिशा दिली तर लालबहादूर शास्त्री यांनी साधेपणा प्रामाणिकपणा आणि देशसेवेचा आदर्श समाजासमोर ठेवला. त्यांच्या विचारांचे स्मरण करून उपस्थितांनी त्यांच्या कार्याला अभिवादन केले.**

**या कार्यक्रमास ग्रामसेवक ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक एकोपा स्वच्छता आणि देशहितासाठी योगदान देण्याचा संदेश देण्यात आला.**

# भालगावात माझं गाव आरोग्यसंपन्न गाव अभियानातून आरोग्याचा जागर

महिलांची स्तन मुख व गर्भाशयाच्या मुखाची तपासणी बीपी रक्तातील साखरेसह कर्करोग प्रतिबंधाबाबत जनजागृती

अंबड प्रतिनिधी :-माझं गाव आरोग्यसंपन्न गाव-तिशीचा पल्ला तपासणी अन् सल्ला अभियान तसेच सेवा संकल्प अभियान अंतर्गत भालगाव येथे बुधवारी दि.३० मोफत आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र धनगर पिंपरी व उपकेंद्र पराडा यांच्या अंतर्गत जीईबीबीएस फाउंडेशन आणि वीरा मेडीसिटी कार्किनोस हॉस्पिटल यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.शिबिरात नागरिकांची विविध आरोग्य तपासणी करून त्यांच्या आरोग्यविषयक तक्रारींबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. विशेषत महिलांच्या आरोग्य तपासणीवर भर देण्यात आला. स्त्रीरोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली महिलांची स्तन तपासणी मुखाची तपासणी तसेच गर्भाशयाच्या मुखाची तपासणी करण्यात आली. कर्करोगाची संभाव्य लक्षणे वेळीच ओळखणे पुढील तपासणीची गरज असल्यास योग्य वैद्यकीय मार्गदर्शन घेणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत महिलांना माहिती देण्यात आली.

रक्तदाब साखरेची तपासणी अन् औषधांचे वाटप

शिबिरात नागरिकांची रक्तदाब बीपी आणि रक्तातील साखरेची तपासणी करण्यात आली. तपासणीतून आरोग्यविषयक तक्रारी आढळलेल्या नागरिकांना आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. गरजेनुसार विविध आजारांवरील औषधांचे वाटपही करण्यात आले.एचपीव्ही लसीकरणाबाबत जनजागृती

गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व नागरिकांना समजावून सांगण्यात आले. नियमित आरोग्य तपासणी संतुलित आहार वैयक्तिक स्वच्छता नियमित व्यायाम आणि कर्करोगाचे लवकर निदान याबाबतही आरोग्य कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

डास व इतर कीटकांमुळे होणाऱ्या आजारांपासून बचावासाठी परिसर स्वच्छ ठेवणे साचलेले पाणी नष्ट करणे आणि आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना




करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या शिबिरासाठी डॉ.सुकेशिनी गवई,सारिका कुलवंत,स्वाती पाटोळे,नेहा ढिलपे,समुदाय अधिकारी डॉ.गीता शंकर, आरोग्यसेविका छाया जिगे, आरोग्यसेवक सुरेश जोनवाळ, अंगणवाडी सेविका कावेरी मुळे,राधा चौरे,आशाताई मीना साबळे यांच्यासह आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, महिलावर्ग आशाताई आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.आरोग्य तपासणीसोबतच प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश देत हे शिबिर ग्रामस्थांसाठी उपयुक्त ठरले.

# तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत संत नारायण महाराज विद्यालय महिंदाचा दबदबा

## विविध क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी



आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत संत नारायण महाराज विद्यालय, महिंदा (ता. आष्टी, जि. बीड) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाचा क्रीडा क्षेत्रातील दबदबा कायम राखला आहे. आष्टी येथील हंबर्डे महाविद्यालयाच्या तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या या स्पर्धेत विद्यालयाच्या खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारांत चमकदार कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली.

१४ वर्षे वयोगटात विद्यालयाचा विद्यार्थी सिद्धार्थ रामकिसन दहिफळे याने उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक, तर लांब उडीमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. महेश दिलीप दहिफळे याने ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक तसेच लांब उडीमध्ये तृतीय क्रमांक पटकावला. याच वयोगटातील विद्यालयाच्या ४ह्व१०० मीटर रिले संघाने द्वितीय क्रमांक मिळवत आपली क्रीडा गुणवत्ता सिद्ध केली.

१७ वर्षे वयोगटातही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. नितेश विष्णू जाधव याने उंच उडीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तर अजय विजय जाधव याने उंच उडीच्या प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशामुळे संत नारायण महाराज विद्यालय महिंदा येथील क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. विद्यार्थ्यांना नियमित सराव, योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाल्याने त्यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

या यशाबद्दल तारकेश्वर गडाचे महंत आदरणीय आदिनाथ महाराज शास्त्री यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेतही उत्तम कामगिरी करण्यासाठी त्यांना शुभाशीर्वाद दिले. तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. विजयकुमार गोल्हार साहेब, विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, मार्गदर्शक प्रशिक्षक तसेच महिंदा, पांगरा लमाण तांडा आणि विठ्ठलवाडी येथील ग्रामस्थांनी यशस्वी खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धांसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

तालुकास्तरीय स्पर्धेत मिळवलेल्या या उल्लेखनीय यशामुळे संत नारायण महाराज विद्यालय महिंदा यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, विद्यालयाच्या या कामगिरीचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.



# जलसेवा संकल्प अभियानामध्ये पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीवर भर द्यावा

## जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

लातूर /प्रतिनिधी

जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पातील सद्यस्थितीतील जलसाठा अतिशय कमी आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत जनजागृतीसाठी उपक्रम जलसंपदा विभागाच्या वतीने जलसेवा संकल्प अभियानाअंतर्गत आयोजित करावेत, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सांगितले.

जलसेवा संकल्प अभियानाला जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या हस्ते सुरुवात झाली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या प्रशासक तथा अधीक्षक अभियंता रुपाली ठोंबरे, कार्यकारी अभियंता महेंद्र काळे, मयूर महाजन, मधुमती तोरणाळे व नागेश व्हट्टे, महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना जलजागृतीची शपथ देण्यात आली.

जलसेवा संकल्प अभियानानिमित्त पाण्याच्या वापराबाबत जनजागृतीसाठी जलसंपदा विभागाने आयोजित केलेल्या मोटारसायकल रॅलीला जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी हिरवी झेंडी दाखवली. या माध्यमातून पाणी बचत आणि पाण्याच्या काटकसरीने वापराबाबत संदेश देण्यात आला.

# वडवणीच्या रामलिंग पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

## १५ टक्के लाभांश व दिवाळीनिमित्त भेटवस्तू जाहीर; सभासदांची दिवाळी गोड



संस्थेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने योगदान द्यावे - अरुणराव गुरसाळी

वडवणी,दि.३०(प्रतिनिधी):- वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या.वडवणीची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि.२९ सप्टेंबर रोजी संस्थेच्या कार्यालयात उपाध्यक्ष अरुणराव गुरसाळी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. यावेळी श्री.चौंडेश्वरी मातेच्या प्रतिमेचे पूजन करून सभेला सुरुवात करण्यात आली.

यावेळी बोलतांना अरुणराव गुरसाळी म्हणाले की, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, संचालक मंडळ व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे संस्थेने उल्लेखनीय प्रगती केली आहे. सन २०२५-२६ मध्ये संस्थेला विक्रमी २ कोटी ६२ लक्ष ८८ हजार २५८ रुपयांचा नफा झाला असून, सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. तसेच आगामी दिवाळीनिमित्त सर्व सभासदांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दि.३१ मार्च २०२६ अखेर संस्थेचे भागभांडवल १ कोटी १४ लक्ष ७७ हजार ९३० रुपये, निधी ९ कोटी २८ लक्ष ७७ हजार ४०० रुपये, ठेवी ६१ कोटी ८२ लक्ष ८५ हजार ८८१ रुपये, कर्ज ४४ कोटी ६४ लक्ष ५७ हजार ८३८ रुपये, गुंतवणूक २८ कोटी ४९ लक्ष ६० हजार ४२३ रुपये असून संस्थेला ऑडिट वर्ग अ प्राप्त आहे. सभेत विविध विषयांवर चर्चा करून सर्व विषयांना मान्यता देत ठराव संमत करण्यात आले. संस्थेच्या पुढील वाटचालीत सभासदांनी एकजुटीने योगदान द्यावे, कर्जवाटप व वसुलीत शिस्त ठेवावी आणि थकीत कर्जाचे प्रमाण नियंत्रणात ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन अरुणराव गुरसाळी यांनी केले. संस्थेला सह्याद्री अर्थरत्न पुरस्कार, बँको पुरस्कार तसेच राज्य पतसंस्था फेडरेशनचा दीपस्तंभ पुरस्कार पाच वेळा मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, माजी व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेबजी मस्के, वैजिनाथजी डिगे, रंजनाताई शिवाजीराव टकले, शैलजाताई अर्जुनराव भंडारे, व्यवस्थापक दिगंबरजी गुरसाळी यांच्यासह कोष्टी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर रोकडे, ज्येष्ठ नेते बाबुशेठ नहार, गुरुप्रसाद गुरसाळी, श्रीराम कल्याणकर, विठ्ठलराव भुजबळ, पांडुरंग बारटक्के, बाबुराव खाटोकर, सुदाम गलांडे, बबनराव कुरकुटे, दादासाहेब भंडारे, दत्तात्रय पारखे, जानकीराम उजगरे, शरीफ शेख, नारायण टिपरे, बाबासाहेब कुरकुटे, वल्लभ गुरसाळी, लक्ष्मण भंडारे, ईश्वर चव्हाण, मच्छिंद्र झाडे, रामा कलेढोण, दत्तात्रय वीर, सुरेश दिवटे, चंद्रकांत कदम, सुधाकर सरवदे, कैलास भुजबळ, गंगाधर कुरकुटे, रमेश टकले, आकेश मुळे, गणेश म्हेत्रे, शिवाजी गुरसाळी, गणेश कुरकुटे, राहुल टकले, संजय खटावकर, सचिन कुरकुटे, रामेश्वर हेकर, गणेश दिंडकर, दिलीप शिंदे, श्रीकिसन बागडे, किशोर गळांगे, सुनिल म्हेत्रे, सुनिल कुरकुटे, भीमराव भंडारे, विठ्ठल खटावकर, महादेव कवडे, अशोक भैरट, दत्तात्रय गार्डी, दिनेश गुगले, अभिषेक वारे यांच्यासह सभासद उपस्थित होते. या सभेचे सूत्रसंचलन व्यवस्थापक दिगंबर गुरसाळी यांनी केले. प्रास्ताविक व अहवाल वाचन अरुणराव गुरसाळी यांनी केले, तर आभार संचालक सर्जेराव महाराज आळणे यांनी मानले.

तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थापक दिगंबर गुरसाळी, कर्मचारी वृंद सचिन म्हेत्रे, ईश्वर ढवळशंक, राहूल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, गणेश भुजबळ, रत्नमाला ढवळशंक, अरुणा पारखे, शिवाजी डिगे, अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे व सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

# म्हसोबावस्तीच्या जि.प.शाळेत महात्मा गांधी जयंती उत्साहात

सर्वज्ञ पोकळे याने साकारली गांधीजींची वेशभूषा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील म्हसोबावस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती तसेच माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बबनराव पोकळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल पोकळे, अक्षय पोकळे, सुरज घाडगे, सतीश पोकळे तसेच भराटे सर यांची उपस्थिती होती.

यावेळी शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थी सर्वज्ञ पोकळे याने महात्मा गांधीजींची वेशभूषा साकारून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर विद्यार्थ्यांसह संपूर्ण म्हसोबावस्ती परिसरातून फेरी काढण्यात आली. या फेरीदरम्यान 'राष्ट्रपिता महात्मा गांधी की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.




फेरीनंतर शाळेत महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी दोन्ही महान व्यक्तींच्या कार्याला अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक भराटे सर यांनी प्रभावीपणे केले. आपल्या मार्गदर्शनातून त्यांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांची व कार्याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल पोकळे यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थांचे आभार मानले. त्यानंतर कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता करण्यात आली.



# महावितरण कर्मचाऱ्याच्या तत्परतेने विद्युत पुरवठा सुरळीत

मानूर प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार येथील लक्ष्मीआई मंदिर येथे विद्युत पुरवठा डीपीमध्ये निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे नागरिकांना वीजपुरवठ्याचा त्रास सहन करावा लागत होता. याबाबत नागरिकांनी महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करून डीपी दुरुस्तीची मागणी केली होती.

महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने दखल घेत डीपीची दुरुस्ती करून वीजपुरवठा सुरळीत केला. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

वेळीच दखल घेऊन समस्या सोडवल्याबद्दल महावितरणचे अधिकारी टेक्निशन शिवाजी गिरी साहेब व कर्मचारी विजय काटे यांचे नागरिकांकडून आभार व्यक्त करण्यात आले यांच्या समवेत उपस्थित अविनाश इंगळे, मन्सूर शेख, वसीम शेख, खुदबुद्दीन शेख अजिंक्य जावळे सोहेल पठाण आदी उपस्थित होते..

# मस्साजोग-शिंदी रस्त्यालगत झाडाझुडपांची वाढ

## अपघाताचा धोका वाढला,काही दिवसा पूर्वी अपघाताची घटना; प्रशासनाने तातडीने झाडे-झुडपे हटविण्याची मागणी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे मस्साजोग ते शिंदी या मार्गालगत मोठ्या प्रमाणात झाडे-झुडपे वाढल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहन चालकांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी वाढलेली झाडे आणि झुडपांमुळे अनेक ठिकाणी रस्त्याचा परिसर अरुंद झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असून,समोरून येणारी वाहने स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.या मार्गा वरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरू असते.मात्र रस्त्यालगत वाढलेल्या झाडाझुडपां मुळे वाहनचालकांना समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेण्यात अडचणी येत आहेत.विशेषतः वळणाच्या ठिकाणी परिस्थिती अधिक धोकादायक बनली आहे.त्यामुळे वाहन चालकांना सावधगिरीने वाहने चालवावी लागत आहेत.काही दिवसा पूर्वी याच रस्त्यावर अपघाताची घटना देखील घडली होती. त्यानंतरही रस्त्यालगत वाढलेल्या झाडा झुडपांकडे संबंधित विभागाचे पुरेसे लक्ष नसल्याने नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे. भविष्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने या समस्ये कडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.रस्त्यालगत वाढलेली झाडे-झुडपे तातडीने हटविण्यात यावीत,धोकादायक ठिकाणी आवश्यक साफसफाई करण्यात यावी आणि वाहन चालकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा यासाठी रस्त्याची पाहणी करून आवश्यक उपाय योजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक व वाहन चालकांकडून करण्यात येत आहे.प्रशासनाने केवळ अपघात झाल्या नंतर उपाययोजना करण्याऐवजी संभाव्य धोका लक्षात घेऊन तातडीने कार्यवाही करावी,अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.मस्साजोग- शिंदी मार्गावरील झाडा झुडपांची



साफसफाई केल्यास वाहन चालकांना मोठा दिलासा मिळणार असून,अपघाताचा धोका देखील कमी होण्यास मदत होणार आहे.

# दुष्काळग्रस्त रुग्णांना संजीवनी चा मोठा दिलासा

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जालना यांचा स्तुत्य उपक्रम उपचारांमध्ये मिळणार विशेष सवलत



जालना शेख फारुक :-

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जालना यांच्या वतीने जालना जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीतील रुग्णांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळामुळे सर्वसामान्य नागरिकांवर येणारा आर्थिक भार लक्षात घेता रुग्णांना वैद्यकीय उपचारांमध्ये विशेष सवलती देण्याची घोषणा हॉस्पिटल प्रशासनाने केली आहे.

आरोग्यसेवेत सवलतींचा धडाका हॉस्पिटलचे संचालक डॉ. बळीरामजी बागल सर यांनी जाहीर केल्यानुसार, या सामाजिक उपक्रमांतर्गत रुग्णांना खालीलप्रमाणे सवलती मिळणार आहेत ओपीडी

शुल्कामध्ये ३०% सवलत

आयपीडी चार्जेस, उपचार, सर्व प्रकारच्या लॅबोरेटरी तपासण्या व औषधांवर १०% सवलत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांचा विस्तार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत राखीव बेडची २५% ची मर्यादा रद्द करण्यात आली असून आता जास्तीत जास्त रुग्णांना या योजनांचा मोफत सवलतीचा लाभ मिळणार आहे. गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळणे हाच उद्देश

दुष्काळाच्या काळात आर्थिक अडचणींमुळे कोणाचाही उपचार लांबणीवर पडू नये आणि गरजू रुग्णांना वेळेवर सर्वोत्तम आरोग्यसेवा मिळावी हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे असे मत संचालक डॉ. बळीरामजी बागल सर यांनी व्यक्त केले. महात्मा गांधीजींच्या विचारसरणीला अनुसरून सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेला हा छोटासा प्रयत्न रुग्णांना आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक संकटातून मोठा दिलासा देणारा ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. संजीवनी हॉस्पिटलच्या या संवेदनशील आणि सामाजिक उपक्रमाचे संपूर्ण जालना जिल्ह्यातून व वैद्यकीय वर्तुळातून विशेष कौतुक होत आहे.




अंबाजोगाई - प्रतिनिधी

दि २ ऑक्टोबर २६ रोजी मोरेश्वर सेवाभावी सं संस्थे कडून मंगळवार पेठ येथील संकट मोचन हनुमान मंदीराजवळ वृक्षारोपण करण्यात आले या वेळी अध्यक्ष प्रमोद गडदे,राठोड सर,मनोहरराव गडदे सर ,अभय जोशी हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. भविष्यात येणाऱ्या अडचणी वर मत करणे तसेचओझान संरक्षण दृष्टीकोन लक्षात घेता हि काळाची गरज आहे त्यामुळे वृक्षारोपण करणे खूपच महत्वाचे आहे.